



दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25




अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १३० । किंमत - २ रू. संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) शनिवार । ३०/०५/२०२६ । पाने -६




# स्वच्छ, सुंदर बसस्थानक स्पर्धेत अकोले बसस्थानकाचा राज्यात प्रथम क्रमांक




युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ व सुंदर बसस्थानक स्पर्धेत अकोले येथील छत्रपती शिवाजी महाराज बसस्थानकाने संपूर्ण राज्यात प्रथम क्रमांक पटकावत मानाचा बहुमान मिळविला आहे. या उल्लेखनीय यशामुळे अकोले तालुक्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून सर्व स्तरांतून समाधान व्यक्त केले जात आहे.

स्वच्छता, प्रवाशांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या आधुनिक सुविधा, आकर्षक व सुशोभित परिसर, नियोजनबद्ध व्यवस्थापन तसेच उत्कृष्ट देखभाल या सर्व निकषांवर अकोले बसस्थानकाने सरस कामगिरी करत राज्यातील अव्वल स्थान पटकावले. परिणामी अकोले बसस्थानक हे राज्यातील आदर्श बसस्थानक म्हणून ओळख निर्माण करण्यात यशस्वी ठरले आहे.

बसस्थानक परिसरातील स्वच्छता, रंगरंगोटी, सुबक रचना, हिरवाई आणि प्रवाशांच्या सोयीसाठी करण्यात आलेल्या विविध सुविधा यामुळे हे बसस्थानक प्रवाशांचे विशेष आकर्षण ठरत आहे. गेल्या काही वर्षांत बसस्थानकाचा झालेला कायापालट (पान २ वर)

# संगमनेर शहर पोलिस ठाणे परिसर बनले वाहनांचे गोडावून, नागरिकांना मोठा मनस्ताप





युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर शहर पोलिस ठाण्याचे आवार सध्या जप्त, अपघातग्रस्त, चोरीस गेलेली व विविध गुन्ह्यांमध्ये पकडण्यात आलेली वाहने यांच्यामुळे अक्षरशः गोडावून बनल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. या वाहनांचा खच वाढत चालल्याने पोलिस ठाणे परिसरात येणाऱ्या नागरिकांना तसेच विविध शासकीय कार्यालयांमध्ये कामानिमित्त येणाऱ्या लोकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

शहर पोलिस ठाण्याच्या आवारात विविध कारवायांमध्ये जप्त केलेली वाहने, चोरीची वाहने तसेच अपघातग्रस्त दुचाकी, चारचाकी, रिक्षा अशी वाहने आणून उभी केली जातात. कालांतराने या वाहनांची संख्या एवढी वाढली आहे की, संपूर्ण परिसरात वाहनांचे जणू कबाडखान्यासारखे स्वरूप निर्माण झाले आहे. त्यामुळे नागरिकांना या वाहनांच्या गर्दीतून वाट काढत संबंधित कार्यालयांपर्यंत पोहोचावे लागत आहे.

विशेष म्हणजे, याच भव्य शासकीय इमारतीमध्ये शहर पोलिस ठाण्यासह तहसील कार्यालय, उपनिबंधक कार्यालय, सेतू सुविधा केंद्र, पुरवठा अधिकारी कार्यालय आणि इतर महत्त्वाची शासकीय कार्यालये कार्यरत आहेत. त्यामुळे दररोज शेकडो नागरिक विविध कामांसाठी या ठिकाणी येत असतात. मात्र आवारातील अनियोजित पार्किंग व भंगार स्वरूपातील वाहनांच्या ढिगाऱ्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे.

या परिस्थितीचा फटका केवळ नागरिकांनाच नव्हे तर पोलिस अधिकारी, कर्मचारी तसेच इतर शासकीय कार्यालयांतील कर्मचाऱ्यांनाही बसत आहे. त्यांच्या वाहनांनाही पार्किंगसाठी पुरेशी जागा उपलब्ध होत नसल्याने त्यांना देखील अडचणींचा सामना करावा लागत आहे. पोलिस ठाण्यात व इतर कार्यालयात कामासाठी येणाऱ्या नागरिकांकडून देखील या शासकीय कार्यालय आवारात तसेच बाहेर रस्त्यावर वाहने आडवे तीडवे उभी केली जातात. अनेक वेळा वाहने या परिसरात उभी करून त्याचे मालक गायब असतात.

दरम्यान कोट्यवधी रुपयांच्या खर्चातून उभारण्यात आलेल्या सुसज्ज शासकीय इमारतीची योग्य देखभाल व वाहतूक व्यवस्थापन होत नसल्याने संपूर्ण परिसराचे सौंदर्यही बाधित होत आहे. वाढत्या वाहनांच्या गर्दीमुळे सुरक्षेचाही प्रश्न निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, या प्रकाराबाबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष कपिल पवार यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. पोलिस प्रशासन, तहसीलदार व संबंधित विभागांनी या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेऊन जप्त व भंगार वाहनांची तातडीने विल्हेवाट लावावी तसेच नागरिकांसाठी स्वतंत्र व सुयोग्य पार्किंग व्यवस्था निर्माण करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

संबंधित प्रशासनाने या समस्येकडे त्वरित लक्ष देऊन योग्य उपाययोजना केल्यास नागरिकांची गैरसोय दूर होण्यास मदत होणार असून शासकीय कार्यालय परिसरातील शिस्त व सुव्यवस्था देखील कायम राहणार आहे.

# मनोज जरांगे उपोषणावर ठाम



जालना (वृत्तसंस्था)

इतिहासात आजपर्यंत झाले नाही असे उपोषण ३० तारखेपासून सुरू करणार असल्याचा इशारा मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. त्यांनी उपोषणाचा इशारा दिल्यानंतर राज्य सरकारचे शिष्टमंडळ जरांगे यांना भेटायला येणार आहे. मात्र ते काय घेऊन येतात? त्यांच्या हातात कोणता प्रस्तव आहे? ते पाहिल्यानंतरच आपण निर्णय घेणार असल्याचे जरांगे पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना मनोज जरांगे पाटील यांनी आपल्या आंदोलनामागील वेदना मांडल्या. उपोषणामुळे माझे प्रचंड हाल होतात, पोटात आग होते, तरीही समाजाच्या लेकरांसाठी मी उन्हात स्वतःला झिजवत आहे असं ते म्हणाले. मराठा समाजाच्या मुलांवर अन्याय होत असल्याचा आरोप करत त्यांनी सरकारला थेट सवाल केला. आमचं काही चुकलं असेल तर आम्हाला फासावर द्या पण गोरगरीब मराठ्यांचं आयुष्य का उध्वस्त करताय? असा संतप्त प्रश्न त्यांनी उपस्थित केला. सरकार केवळ राजकारण, निवडणुका आणि पक्षफोडीत व्यस्त असल्याचा आरोपही त्यांनी केला.

- सरकारच्या शिष्टमंडळासोबत चर्चा होणार असली तरी आंदोलन मागे घेण्याचा कोणताही निर्णय अद्याप झालेला नसल्याचं जरांगेंनी स्पष्ट केलं. सरकारची भूमिका काय आहे, ते आधी कळू द्या. विखे पाटील आणि इतर मंत्री काय अंमलबजावणी घेऊन येत आहेत, हे मी पाहणार आहे. पण ३० मेचं उपोषण निश्चित आहे, अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली. हे आंदोलन इतकं कठोर असेल की देशाने यापूर्वी असं काही पाहिलेलं नसेल, असा इशाराही त्यांनी सरकारला दिला. आश्वासनांवर समाजाचं पोट भरत नाही, अशी टीका करत त्यांनी ठोस निर्णयाची मागणी केली. दरम्यान, सरकार सकारात्मक असल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटल्यानंतर त्यावरही जरांगेंनी उपरोधिक प्रतिक्रिया दिली. १० महिन्यांत मराठा समाजाचं वाटोळं झालं, त्यालाच सरकार सकारात्मक म्हणत असेल तर ते खरंच आहे, असा टोला त्यांनी लगावला.

## ओबीसी आरक्षणाला धक्का लागल्यास रस्त्यावर उतरणार - बबनराव तायवाडे

**मराठा समाजाच्या मागण्या पूर्ण करताना ओबीसी आरक्षणाला धक्का लागला, तर राज्यभर तीव्र आंदोलन उभं राहील, असा स्पष्ट संदेश महासंघाचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे यांनी दिला आहे. त्यामुळे सरकारसमोर आता दोन्ही समाजांचा समतोल राखण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा भर उन्हात आमरण उपोषणाचा इशारा दिल्यानंतर राज्यात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.**

**मराठा समाजाच्या मागण्यांवर सरकारने ठोस निर्णय घ्यावा, यासाठी जरांगे पाटील आक्रमक झाले आहेत. त्याचवेळी ओबीसी संघटनांनीही आपली भूमिका अधिक तीव्र केली आहे. नागपुरात घेतलेल्या पत्रकार परिषदेत डॉ. बबनराव तायवाडे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, मराठा समाजाच्या आंदोलनाला त्यांचा विरोध नाही. मात्र, ओबीसींच्या आरक्षणात कपात किंवा हस्तक्षेप करण्याचा कोणताही प्रयत्न सहन केला जाणार नाही. सरकारने दबावाखाली निर्णय घेतल्यास राज्यभर ओबीसी समाज रस्त्यावर उतरेल, असा इशाराही त्यांनी दिला.**

# पुण्यात मृत्यूंचे थैमान

## विषारी दारूने १५ जणांचा घेतला बळी




पुणे (वृत्तसंस्था)


पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात विषारी दारूमुळे मृत्यूंची मालिका सुरू झाल्याने संपूर्ण शहर हादरलं आहे. आतापर्यंत १५ जणांचा संशयास्पद मृत्यू झाल्याची माहिती समोर आली असून अनेक नागरिक विविध रुग्णालयांत गंभीर अवस्थेत उपचार घेत आहेत. दापोडी, फुगेवाडी, हडपसर आणि काळेपडळ या भागांत ही घटना घडली असून, स्पिरिटयुक्त हातभट्टीची दारू प्यायल्याने नागरिकांचा मृत्यू झाल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. या प्रकरणामुळे पोलिस प्रशासनावरही गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

या संपूर्ण प्रकरणामागे योगेश वानखेडे नावाच्या सराईत दारू विक्रेत्याचा हात असल्याची माहिती तपासातून पुढे आली आहे. पोलिसांनी त्याला अटक केली असून त्याच्यावर यापूर्वीही अनेक गुन्हे दाखल असल्याचं समोर आलं आहे. त्याने तयार केलेली विषारी दारू पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील विविध भागांत विकली गेली होती. दारू सेवन केल्यानंतर अनेकांना अचानक चक्कर येणे, उलट्या होणे आणि तोंडाला फेस येणे अशी लक्षणं दिसू लागली. त्यानंतर काही तासांतच अनेकांचा मृत्यू झाला.

पिंपरी-चिंचवडमधील दापोडी आणि फुगेवाडी परिसरात गुरुवारी एकाच दिवशी ८ जणांचा मृत्यू झाल्याने परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालं. याशिवाय पुण्यातील काळेपडळ भागात ३ आणि हडपसरमध्ये २ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. गेल्या ४८ तासांत आणखी ३ जणांचा मृत्यू झाला असून मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. वायसीएम रुग्णालयात उपचार घेत असलेल्या अक्षय अवसरमल यांचा मृत्यू झाला, तर सौरभप्पा भंगारी यांचा मेडीपॉईंट रुग्णालयात मृत्यू झाला. भीमाप्पा बसवंत पुजारी यांचाही उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे.



# आखातात पुन्हा भडका!, युद्धविराम संकटात

## इराणचा कुवेतवर क्षेपणास्त्र हल्ला

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

कुवेतवर गुरुवारी क्षेपणास्त्र आणि ड्रोनने हल्ला करण्यात आल्याची माहिती कुवेत सरकारने दिली आहे. या दाव्यामुळे अमेरिका आणि इराण या दोन्ही बाजूंकडून झालेल्या हल्ल्यांनंतर आधीच नाजूक असलेला युद्धविराम आता अधिकच गुंतागुंतीचा झाला आहे. कुवेतच्या लष्कराने या हल्ल्याला दुजोरा दिला आहे, परंतु नेमक्या कोणत्या ठिकाणांना लक्ष्य करण्यात आले, हे जाहीर केलेले नाही. या घटनेच्या काही तासांनंतर इराणने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली, मात्र त्यांनीही आपल्या निशाण्यावर नेमके काय होते, हे स्पष्ट केले नाही. चालू युद्धादरम्यान इराण आणि इराकमधील इराण समर्थित शिया सशस्त्र गटांकडून कुवेतवर यापूर्वीही अनेकदा हल्ले करण्यात आले आहेत.लेबनॉनवर इस्त्रायलच्या हल्ल्यात ८ नागरिक ठारबैरूत : इस्त्रायलच्या सैन्याने गुरुवारी पहाटे लेबनॉनमधील टायर या चौथ्या क्रमांकाच्या सर्वात मोठ्या शहरावर भीषण बॉम्बहल्ला केला. या हल्ल्यात किमान आठ जण ठार झाले आहेत. वॉशिंग्टन येथे होणाऱ्या अत्यंत महत्त्वाच्या चर्चेपूर्वी, 'हिजबुल्लाह' या सशस्त्र गटाविरुद्ध लष्करी कारवाई तीव्र करण्याच्या इस्त्रायलच्या मोहिमेचा हा एक भाग आहे. लेबनॉनच्या सरकारी 'नॅशनल न्यूज एजन्सी'ने दिलेल्या माहितीनुसार, या हवाई हल्ल्यांमध्ये अनेक लोक जखमीही झाले आहेत.

# केंद्र सरकारचा सर्वात मोठा निर्णय नीट परीक्षा थेट लष्कर मैदानात

मुंबई (वृत्तसंस्था)

देशभरात सातत्याने गाजत असलेल्या वैद्यकीय प्रवेशासाठीच्या 'नीट' परीक्षेतील घोटाळे आणि पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार आता पूर्णपणे ॲक्शन मोडमध्ये आले आहे. आगामी २१ जून रोजी होणारी नीटची फेरपरीक्षा अत्यंत पारदर्शक, सुरक्षित आणि योग्य रीतीने पार पाडण्यासाठी सरकारनं थेट भारतीय लष्कराची मदत घेण्याचा निर्णय घेतला आहे. इतकंच नव्हे, तर देशातील सर्व परीक्षा केंद्रांवर गोपनीय पेपर्स सुरक्षितपणे पोहोचवण्यासाठी भारतीय वायूदलाची मदत घेतली जाणार आहे. एबीपी माझाशी बोलताना केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी ही माहिती दिली. नीटच्या फेरपरीक्षेच्या नियोजनासंदर्भात आज देशाची राजधानी दिल्लीमध्ये एक अत्यंत उच्चस्तरीय आणि महत्त्वाची बैठक पार पडली. केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या अधिकृत निवासस्थानी ही बैठक पार पडली. या महत्त्वपूर्ण बैठकीला केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान, केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया, एनटीएचे महासंचालक अभिषेक सिंह, सीबीएसईचे वरिष्ठ अधिकारी आणि पंतप्रधान कार्यालयातील काही वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत २१ जून रोजी होणाऱ्या फेरपरीक्षेच्या संपूर्ण सुरक्षा व्यवस्थेवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीनंतर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी 'एबीपी नेटवर्क'शी खास संवाद साधताना या ऐतिहासिक निर्णयाची घोषणा केली.परीक्षेतील वाढते गैरप्रकार रोखण्यासाठी आणि देशभरातील लाखो विद्यार्थ्यांचा तसेच पालकांचा विश्वास पुन्हा निर्माण करण्यासाठी केंद्र सरकारने कंबर कसली आहे. या बैठकीत नीट परीक्षा अधिक पारदर्शक आणि 'फुलप्रूफ' करण्याबाबत विविध मुद्द्यांवर सखोल चर्चा झाली. परीक्षा प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर तांत्रिक सुधारणा केल्या जाणार असून, संवेदनशील परीक्षा केंद्रांवर कडक पहारा ठेवण्यात येणार आहे. पेपर लीकचा कोणताही मार्ग उरणार नाही, अशा प्रकारे तांत्रिक आणि मानवी सुरक्षा यंत्रणा तैनात केली जाईल. पेपर वाहतुकी दरम्यान होणारे गैरप्रकार टाळण्यासाठीच वायूदलाच्या विशेष विमानांची मदत घेतली जाणार आहे.

# १ जून ते ३१ जुलैदरम्यान किनारपट्टीत मासेमारीस मनाई

मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्र सरकारने १ जून ते ३१ जुलै २०२६ पर्यंत किनारपट्टीच्या भागात मासेमारीवर बंदी घातली आहे. अशी माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार महाराष्ट्र सरकारने पावसाळ्यात सागरी जीवसृष्टीचे संरक्षण करण्यासाठी आणि मच्छिमारांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. सरकारने जारी केलेल्या अधिकृत अधिसूचनेनुसार, राज्यातील किनारपट्टीच्या भागात १ जून ते ३१ जुलै २०२६ पर्यंत सागरी मासेमारीवर संपूर्ण बंदी घालण्यात आली आहे.या निर्णयाचा मुख्य उद्देश पावसाळ्यात समुद्रातील संभाव्य अपघात टाळणे आणि सागरी संसाधनांचे संरक्षण करणे हा आहे. मत्स्य विभागाच्या आदेशानुसार, महाराष्ट्राच्या किनारपट्टीपासून १२ सागरी मैलांच्या आत यांत्रिक आणि मोटारयुक्त बोटींद्वारे मासेमारी करण्यास सक्त मनाई आहे. प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, महाराष्ट्र सागरी मत्स्यव्यवसाय नियमन (सुधारणा) अधिनियम, २०२१ च्या तरतुदींनुसार या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल.पावसाळ्यात समुद्राच्या लाटा अत्यंत खवळलेल्या आणि धोकादायक असतात, ज्यामुळे मच्छिमारांच्या जीवाला धोका वाढतो. शिवाय, हा माशांचा प्रजननाचा हंगामही असतो. या काळात मासेमारी थांबवल्याने सागरी मत्स्यसंपत्ती वाढण्यास मदत होते. विभागाचा विश्वास आहे की, या दोन महिन्यांच्या खंडामुळे भविष्यात मच्छिमारांसाठी माशांची अधिक उपलब्धता तर सुनिश्चित होईलच, शिवाय त्यांचा नफाही वाढेल. मुंबई शहराच्या मत्स्यव्यवसाय सहायक आयुक्तांनी सर्व मच्छिमार, बोटींचे मालक आणि कर्मचाऱ्यांना सरकारी आदेशांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे.



# चॉकलेटप्रेमींनो सावध राहा!

## जाणून घ्या किती आहे धोकादायक

अलीकडच्या काळात विविध खाद्यपदार्थांच्या सुरक्षिततेबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. आता काही चॉकलेट उत्पादनांमध्ये लिस्टेरिया नावाचा धोकादायक जीवाणू आढळल्याची माहिती समोर आल्यानंतर ग्राहकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर काही देशांमध्ये संबंधित उत्पादनांबाबत सतर्कतेचा इशारा देण्यात आला असून काही कंपन्यांनी विशिष्ट बॅचमधील उत्पादने बाजारातून मागे घेण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

आरोग्य तज्ज्ञांच्या मते, लिस्टेरिया हा अन्नातून पसरणारा जीवाणू आहे. दूषित अन्नपदार्थांच्या माध्यमातून तो शरीरात प्रवेश करू शकतो. विशेषतः प्रक्रिया केलेले अन्न, दुग्धजन्य पदार्थ, थंड साठवलेले खाद्यपदार्थ आणि काही पॅकबंद वस्तूंमध्ये त्याचा संसर्ग आढळण्याची शक्यता असते. संसर्ग झाल्यास ताप, अंगदुखी, उलट्या, जुलाब आणि अशक्तपणा यांसारखी लक्षणे दिसू शकतात. गर्भवती महिला, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले तसेच कमी प्रतिकारशक्ती असलेल्या व्यक्तींना या संसर्गाचा अधिक धोका असतो. काही गंभीर प्रकरणांमध्ये मज्जासंस्थेवर परिणाम होण्याची शक्यताही डॉक्टरांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे पॅकबंद पदार्थ खरेदी करताना ग्राहकांनी अधिक जागरूक राहणे आवश्यक असल्याचे तज्ज्ञ सांगतात. खाद्यपदार्थ खरेदी करताना उत्पादन तारीख, एक्सपायरी डेट आणि पॅकेजिंगची स्थिती तपासणे अत्यंत गरजेचे आहे. पॅकेट फुगलेले असल्यास, वास बदललेला असल्यास किंवा चव वेगळी वाटल्यास असे पदार्थ सेवन करणे टाळावे. तसेच फ्रिजमध्ये ठेवलेले अन्नही जास्त काळ साठवून न ठेवण्याचा सल्ला दिला जात आहे. तज्ज्ञांच्या मते, अन्न हाताळताना स्वच्छतेची योग्य काळजी घेतल्यास अशा संसर्गाचा धोका कमी करता येतो. नियमित हात धुणे, ताजे अन्न सेवन करणे आणि अन्न योग्य तापमानात साठवणे या सवयी आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या ठरतात.

# तुकाराम मुंढेंचा धडाका; राज्यभर भेसळखोरांवर मोठी कारवाई

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त म्हणून तुकाराम मुंढे यांनी २५ मे रोजी कार्यभार घेताच राज्यातील सर्व अधिकाऱ्यांना धाडी व जप्तीची विशेष मोहीम राबविण्याबाबत निर्देश दिलेले होते. त्यानुसार राज्यातील अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी प्रशासनाच्या बृहन्मुंबई, कोकण, पुणे, नाशिक, अमरावती, नागपूर व छत्रपती संभाजीनगर या विभागात नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या भेसळखोर, प्रतिबंधित गुटखा विक्रेते, अस्वच्छ अन्न उत्पादक आणि नियमभंग करणाऱ्या



आस्थापनांविरोधात अभूतपूर्व, अशी धडक कारवाई सुरू आहे.

गत तीन दिवसांत तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी राज्यातील विविध भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर छापे टाकून प्रतिबंधित गुटखा, सुगंधित तंबाखू, भेसळयुक्त दूध, नियमबाह्य खाद्यपदार्थ, असुरक्षित उत्पादन प्रक्रिया आणि दिशाभूल करणारे पॅकिंग यावर कठोर कारवाई केलेली आहे.

या मोहिमेत गुटखा, पानमसाला व तत्सम प्रतिबंधित अन्नपदार्थाच्या प्रकरणी ५३ आस्थापनांची तपासणी केलेली असून त्यातील ३४ ठिकाणी गुटखा, पानमसाला व तत्सम प्रतिबंधित अन्नपदार्थाची विक्री होत असल्याचे आढळून आले. एकूण २५ एफआयआर दाखल करून ३३ व्यक्तींना अटक केलेली आहे. ५ वाहने जप्त करून २७ आस्थापना सील केलेल्या आहेत. या प्रकरणी सुमारे २०,५७,२९६ रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केलेला आहे, त्यापैकी बृहन्मुंबई विभागात १९ आस्थापनांची तपासणी करून १९ आस्थापना सील केलेल्या आहेत, १९ व्यक्तींविरुद्ध एफआयआर दाखल करून त्यांना अटक करण्यात आली आहे. गुटखा, पानमसाला व तत्सम प्रतिबंधित अन्नपदार्थाच्या व्यतिरिक्त प्रशासनाच्या बृहन्मुंबई, कोंकण, पुणे, नाशिक, अमरावती, नागपूर व छत्रपती संभाजीनगर या विभागातील अधिकाऱ्यांनी २३ आस्थापनांची तपासणी करून पॅकबंद पिण्याचे पाणी, दूध, नुडल्स, कार्बोनेटेड वॉटर, खाद्यतेल, स्वीट् व फरसाण, आईसक्रीम, ताडी, डिंक, मसाले, खवा, पनीर, तूप, बेसन व बेकारी पदार्थ या अन्नपदार्थाचा सुमारे २८ लाख ७८ हजार ५७२ रुपये किंमतीचा साठा जप्त करून त्याचे विश्लेषणासाठी नमुने घेतले आहेत.

# सोन्या-चांदीच्या किंमतीत जोरदार उसळी

मुंबई (वृत्तसंस्था)

जागतिक बाजारातील घडामोडींच्या पार्श्वभूमीवर आज, शुक्रवारी सोन्या आणि चांदीच्या किमतीत मोठी वाढ पाहायला मिळत आहे. बुधवारच्या तुलनेत आज दोन्ही मौल्यवान धातूंचे दर वधारले आहेत. 'इंडियन बुलियन्स ज्वेलर्स असोसिएशनच्या रिपोर्टनुसार, २४ कॅरेट सोन्याचा भाव आज शुक्रवारी सकाळी १,५७,०४३ रुपये प्रति १० ग्रॅम या पातळीवर पोहोचला आहे. यापूर्वी बुधवार संध्याकाळी सोन्याचा दर १,५६,०७२ रुपये होता, म्हणजेच तेव्हापासून आतापर्यंत सोन्याच्या किमतीत ९७१ रुपयांची वाढ झाली आहे. गुरुवार रोजी सराफा बाजार बंद असल्यामुळे नवीन दर जाहीर करण्यात आले नव्हते.चांदीच्या दरात ३,०४९ रुपयांची मोठी वाढ बुधवार संध्याकाळच्या तुलनेत चांदीच्या किमतीत लक्षणीय वाढ झाली आहे. शुक्रवारी दुपारी १ किलो चांदीचा दर २,६३,९६६ रुपये प्रति किलो एवढा आहे. बुधवार संध्याकाळी चांदी २,६०,९१७ रुपये प्रति किलो या दरानं विकली जात होती. म्हणजेच परवाच्या तुलनेत आज चांदीच्या दरात प्रति किलो ३,०४३ रुपयांची वाढ झाली आहे. कागदी चलनाचे दिवस संपणार? २३ कॅरेट सोन्याचे आजचे दर (प्रति १० ग्रॅम):२३ कॅरेट सोनं : १,५६,४१४ रुपये. २२ कॅरेट सोनं : १,४३,८५१ रुपये, १८ कॅरेट सोनं : १,१७,७८२ रुपये, १४ कॅरेट सोनं : ९१,८७० रुपये, या स्थिरतेमागे सध्याची जागतिक परिस्थिती कारणीभूत आहे. अमेरिका आणि इराणमधील युद्धाबाबत अजूनही अनिश्चितता कायम आहे .

# स्वच्छ, सुंदर बसस्थानक...

पान १ वरून -

नागरिकांच्या विशेष चर्चेचा विषय बनला आहे.

या परिवर्तनामागे आमदार डॉ. किरण लहामटे यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा, नियोजनबद्ध प्रयत्न आणि विकासाभिमुख दृष्टीकोन महत्त्वाचा ठरल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत. बसस्थानकाच्या विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देत त्यांनी प्रशासनाशी समन्वय साधून विविध विकासकामांना गती दिली. त्यातूनच आज आधुनिक, स्वच्छ आणि सुंदर स्वरूपातील बसस्थानक प्रवाशांच्या सेवेत उभे राहिले आहे. राज्यस्तरीय स्पर्धेत मिळालेल्या या मानाच्या यशाबद्दल बसस्थानक प्रशासन, कर्मचारीवर्ग, स्थानिक नागरिक तसेच आमदार डॉ. किरण लहामटे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून अकोलेकरांसाठी हा अभिमानाचा क्षण ठरला आहे.

# खा. संजय राऊत यांच्या सभेने सेनेची तोफ धडाडणार

## निष्ठावान शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे – अमर कतारी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त शिर्डी लोकसभा मतदारसंघात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी तसेच शिवसैनिक आणि पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने पक्षाचे मुख्य प्रवक्ते तथा खासदार संजय राऊत यांची भव्य जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे.

ही सभा मंगळवार, दि. २ जून २०२६ रोजी दुपारी १२ वाजता शिर्डी येथील एअरपोर्ट रोडवरील साई किमया गार्डन लॉन्स येथे होणार असल्याची माहिती जिल्हाप्रमुख सचिनभाऊ कोते पाटील, राजेंद्र दळवी आणि जगदीश चौधरी यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली. सभेला माजी खासदार चंद्रकांतदादा खैरे, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, खासदार भाऊसाहेब वाकचौरे तसेच वरळीचे आमदार सुनील शिंदे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.



या सभेत पक्ष संघटन, राज्यातील सध्याच्या राजकीय घडामोडी आणि शिवसेनेची आगामी भूमिका यासंदर्भात खासदार संजय राऊत मार्गदर्शन करणार आहेत. उत्तर नगर जिल्ह्यातील शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन उपजिल्हाप्रमुख अमर कतारी यांनी केले आहे.

तसेच शिवसेना, युवासेना, महिला आघाडी, अपंग सहाय्य सेना, वाहतूक सेना, ग्राहक संरक्षण कक्ष, व्यापारी आघाडी, एसटी कामगार सेना तसेच सर्व अंगीकृत संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि निष्ठावान शिवसैनिकांनी सभेला उपस्थित राहावे, असे आवाहन शहरप्रमुख अमित चव्हाण, फैसल सय्यद, तालुकाप्रमुख भीमाशंकर पावसे, भाऊसाहेब हासे, विधानसभा प्रमुख योगेश खेमनर, युवासेना जिल्हाप्रमुख अक्षय गुंजाळ, जिल्हा संघटक पप्पूशेठ कानकाटे, आश्वी मंडल प्रमुख प्रकाश गायकवाड, बोटा मंडल प्रमुख अमित फटांगरे, उपजिल्हा संघटक रंगनाथ फटांगरे, व्यापारी आघाडी प्रमुख संभव लोढा, वाहतूक सेना जिल्हाप्रमुख इम्तियाज शेख, बाळासाहेब घोडके, आसिफभाई तांबोळी, दीपकभाऊ साळुंखे, अमोल डुकरे, महिला आघाडी उपजिल्हाप्रमुख आशाताई केदारी, तालुकाप्रमुख शितलताई हासे, महिला आघाडी शहरप्रमुख संगीता गायकवाड, वैशाली वडतले, राजश्री रहाणे आणि राजश्री वाकचौरे यांनी केले आहे.

# महाराष्ट्रात यंदा कमी पाऊस

## उष्णतेची लाट अधिक - आयएमडी

मुंबई - महाराष्ट्रातील शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांची धाकधूक वाढवणारी एक मोठी बातमी समोर आली आहे. भारत हवामान विभागाने आज नैऋत्य मान्सून २०२६ साठी दुसऱ्या टप्प्याचा दीर्घकालीन अंदाज जाहीर केला आहे. या ताज्या अंदाजानुसार, महाराष्ट्रासाठी यंदाच्या मान्सून हंगामात अत्यंत चिंताजनक चित्र समोर आले आहे. राज्यात यंदा पाऊस सामान्यपेक्षा कमी पडण्याची आणि उष्णतेच्या लाटा तीव्र राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, देशभरात यंदाच्या मान्सून हंगामात दीर्घकालीन सरासरीच्या केवळ ९० टक्के पाऊस पडण्याची शक्यता आहे. हे प्रमाण सामान्यपेक्षा कमी मानले जाते. महाराष्ट्र हा प्रामुख्याने मध्य भारत आणि दक्षिण द्वीपकल्प या दोन्ही विभागांत मोडतो. या दोन्ही विभागांत यंदा सामान्यपेक्षा कमी पावसाचा अंदाज आहे. मध्य भारतात ४३ टक्के तर दक्षिण द्वीपकल्पात ४५ टक्के संभाव्यता कमी पावसाची आहे.महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील बहुतांश भाग हे मान्सून कोअर झोनमध्ये येतात. हाच झोन देशातील आणि राज्यातील बहुतांश कोरडवाहू शेतीचा मुख्य कणा आहे.

# करुले येथे कत्तलीपासून चार गोवंश जातीच्या जनावरांची सुटका



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील करुले शिवारात कत्तलीकरीता आणलेल्या चार गोवंश जातीच्या जनावरांची संगमनेर तालुका पोलिसांनी कत्तलीपासून सुटका केली. सदर कारवाई मंगळवारी (दि. २६) रात्री साडेआठ वाजेच्या सुमारास केली.

याबाबत तालुका पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी, की पोलीस निरीक्षक प्रवीण साळुंखे यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली, की करूले शिवारात राहुल आखाडे याच्या घराच्या पाठीमागील बाजूस गोवंश जनावरे कत्तल करण्याच्या उद्देशाने चारा पाणी न देता निर्दयतेने बांधून ठेवलेली आहे. त्यावरुन याठिकाणी पोलिसांच्या पथकाने छापा टाकला असता ८० हजार रुपये किंमतीची चार गोवंश जनावरे मिळून आली. याप्रकरणी पोहेकॉ. सचिन उगले यांच्या फिर्यादीवरून राहुल गोरक्ष आखाडे, गणेश दगडू कदम (दोघेही रा. करूले, ता. संगमनेर) व मोहम्मद अली कुरेशी (रा. भारतनगर, ता. संगमनेर) यांच्याविरूध्द तालुका पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्ह्यांत गणेश कदम यास अटक केली आहे. त्यांवर संगमनेर शहर पोलीस ठाणे व संगमनेर तालुका पोलीस ठाणे येथे अशाप्रकारचे गुन्हे दाखल आहेत. विशेष म्हणजे त्यास तालुका प्रवेश हद्दीत बंदी असतानाही तो गुन्हा करताना मिळून आला.

# जिल्हा परिषदेत दिव्यांग प्रमाणपत्रांची नव्याने छाननी सुरु

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - जिल्हा परिषदेत नोकरी मिळवण्यासाठी किंवा बदली प्रक्रियेत सवलत घेण्यासाठी बनावट दिव्यांग प्रमाणपत्र सादर करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर आता थेट निलंबनाची कारवाई न करता, त्यांची खातेअंतर्गत चौकशी करण्यात येणार आहे. तसेच, जिल्हा पातळीवरील दिव्यांग प्रमाणपत्र मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्यांऐवजी त्यांच्या वरिष्ठ अधिकारी अथवा कार्यालयमार्फत या प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यात यावी असे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

या आदेशानुसार, जिल्हा परिषद प्रशासनाने पूर्वी तपासणी केलेल्या ५०४ कर्मचाऱ्यांच्या प्रमाणपत्रांची नव्याने



पुनर्पडताळणी करण्याचा निर्णय घेतला आहे.

राज्याच्या दिव्यांग कल्याण विभागाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या आदेशानुसार, जिल्हा परिषद प्रशासनाने मागील वर्षीपासून जिल्ह्यातील दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या प्रमाणपत्रांची तपासणी सुरू केली होती. नोकरी आणि बदलीसाठी सादर करण्यात आलेल्या या प्रमाणपत्रांची जिल्हा स्तरावर जिल्हा शल्यचिकित्सकांमार्फत (सिव्हिल सर्जन) प्राथमिक तपासणी करण्यात आली. या छाननीत ५०४ कर्मचाऱ्यांकडे दिव्यांग प्रमाणपत्रे असल्याचे समोर आले होते. त्यापैकी १५ कर्मचाऱ्यांची प्रमाणपत्रे बनावट असल्याचे सिद्ध झाल्यानंतर जिल्हा परिषद प्रशासनाने त्यांच्यावर निलंबनाची कारवाई केली होती.

या निलंबित कर्मचाऱ्यांपैकी काहींनी न्यायालयाचे दरवाजे ठोठावले होते. त्यावर झालेल्या सुनावणीत न्यायालयाने संबंधित कर्मचाऱ्यांचे निलंबन मागे घेण्याचे आदेश दिले. तसेच, यापुढे बनावट दिव्यांग प्रमाणपत्र आढळल्यास कर्मचाऱ्याला थेट निलंबित न करता त्याची खातेतंर्गत चौकशी केली जावी, असे स्पष्ट केले. याशिवाय सर्व संशयास्पद प्रमाणपत्रांची वरिष्ठ पातळीवरून पुनर्पडताळणी करण्याचे निर्देशही न्यायालयाने दिले. न्यायालयाच्या या निर्णयामुळे पूर्वी बनावट प्रमाणपत्र प्रकरणात दोषी ठरून निलंबित झालेल्या कर्मचाऱ्यांना पुन्हा सेवेत सामावून घेण्याची प्रक्रिया जिल्हा परिषदेकडून सुरू करण्यात आली आहे. आता या ५०४ कर्मचार्यांच्या प्रमाणपत्रांची पडताळणी नाशिकच्या विभागीय आरोग्य संचालकांमार्फत केली जाणार आहे. त्यादृष्टीने संबंधित दिव्यांग कर्मचार्यांची सविस्तर यादी तयार करण्याचे काम सुरू असल्याची माहिती जिल्हा परिषद सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके यांनी दिली.


संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०


We treat He cure's
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा, स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५




# रॉकेल वाटपात अडचणींचा डोंगर, दोन महिन्यांपासून ग्राहकांना प्रतिक्षा

अहिल्यानगर (युवावार्ता प्रतिनिधी)-

अमेरिका-इराण युद्धामुळे एलपीजी गॅस टंचाई निर्माण झाली. केंद्र शासनाने गॅसला पर्याय म्हणून रॉकेल वाटपाचा निर्णय घेतला आहे. नागरिकांकडे रॉकेलच्या वापरासाठी स्टोव्ह नसणे, वितरकांकडे वितरणाच्या साहित्याचा अभाव आणि तुटपुंजे कमिशन, या सर्व प्रतिकूल परिस्थितीमुळे दोन महिन्यांपासून रॉकेल वाटपाची प्रक्रिया रखडली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ मध्ये केंद्रात सत्तेवर आल्यानंतर 'प्रधानमंत्री उज्वला' योजना ही एक महत्त्वाकांक्षी योजना आणली. दारिद्र्यरेषेखालील आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील महिलांना मोफत एलपीजी गॅस कनेक्शन आणि सबसिडी देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश होता. लाकूड, कोळसा यांसारख्या पारंपरिक इंधनामुळे होणाऱ्या धुरापासून महिलांची सुटका होऊन आरोग्य सुधारणा व्हावी, हा या योजनेतील महत्त्वाचा उद्देश होता. या योजनेमुळे सर्वच कुटुंबांकडे एलपीजी गॅस आल्याने रॉकेलमुक्त जिल्हे झाले.



अहिल्यानगर जिल्हा २०१६ मध्ये रॉकेलमुक्त झाला. गावोगाव असलेल्या रॉकेल वितरकांनी त्यांच्याकडील वितरणाचे साहित्य नष्ट केले. स्टोव्हही नामशेष झाले. जिल्ह्यात एलपीजी सिलिंडरच्या संभाव्य तुटवड्यामुळे केंद्र शासनाने अंत्योदय व प्राधान्य कुटुंब योजनेतील शिधापत्रिकाधारकांसाठी रॉकेल वाटपाचा निर्णय घेतला आहे. प्रत्येक पात्र कुटुंबाला प्रतिकार्ड ३ लिटर रॉकेल दिले जाणार आहे. रॉकेलचा दर ६२ रुपये प्रतिलिटर असा निश्चित करण्यात आला आहे. जिल्ह्यासाठी २१६ किलोलिटर (२ लाख १६ हजार लिटर) रॉकेल मंजूर करण्यात आले आहे.

जिल्ह्यात ४१ घाऊक, तर १० अर्धघाऊक रॉकेल विक्रेते होते. त्यांच्याकडील रॉकेल वितरणाची व्यवस्था नामशेष झालेली आहे. रॉकेल पुरवठादारांकडेही टँकर नाहीत. तरीही काही वितरकांनी घाऊक रॉकेलचा पुरवठा करण्याची तयारी दर्शविली आहे. रॉकेल वितरकांना प्रत्येक लिटरमागे एक रुपया तीस पैसे कमिशन ठरविल्याने वितरक तयार होत नाहीत. वितरकांना प्रत्येक गावोगाव जाऊन रॉकेलचे वाटप करावे लागणार आहे. एका तालुक्यात साधारण शंभरच्या आसपास गावे असतात. एका गावात २०० ते ३०० लिटर रॉकेल वाटप करावे लागणार आहे. त्यामुळे ते वितरणासाठी अनुत्सुक असल्याचे चित्र आहे. प्रत्येक तालुक्याला १२ हजार लिटर रॉकेलचा कोटा मंजूर करण्यात आला आहे. अहिल्यानगर ग्रामीण आणि शहरी भागासाठी २४ हजार लिटर, तसेच राहुरीत शिधापत्रिकाधारक सर्वाधिक आहेत. त्यामुळे राहुरी तालुक्यालाही २४ हजार लिटर कोटा मंजूर झाला आहे. अकोले तालुक्यासाठीही २४ हजार लिटरचा कोटा मंजूर झाला आहे.

# बेलापूरकर ग्रामस्थ आक्रमक; 'जलजीवन' योजनेसाठी विहीर खोदण्यास तीव्र विरोध

अकोले (युवावार्ता प्रतिनिधी)-

अकोले तालुक्यातील पठार भागातील बदगी गावाच्या 'हर घर जल' योजनेसाठी बेलापूर धरण परिसरात विहीर खोदण्याच्या प्रशासनाच्या प्रयत्नांना बुधवारी बेलापूर ग्रामस्थांनी जोरदार विरोध केला. पोलिस बंदोबस्तात महसूल, जलसंपदा, पाणीपुरवठा व लघुपाटबंधारे विभागाचे अधिकारी पोकलेन यंत्रासह घटनास्थळी दाखल झाले होते. मात्र ग्रामस्थांच्या तीव्र आक्रमक भूमिकेमुळे प्रशासनाला अखेर माघार घ्यावी लागली.

बेलापूर धरणाच्या लाभक्षेत्रातील पवारवाडी, जाचकवाडी, गोपाळवाडी, मोघडवाडी, चैतन्यपूर आणि भक्ताचीवाडी या गावांमध्ये सध्या तीव्र पाणीटंचाईची समस्या निर्माण झाली आहे. बेलापूर व कोटमारा धरणांमध्ये उन्हाळ्यासाठी पिण्याचे पाणी राखीव ठेवण्यात प्रशासन अपयशी ठरल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. धरणांनी तळ गाठल्याने नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी भटकंती करावी लागत असून जनजीवन विस्कळीत झाले आहे.

दरम्यान, डोंगरदऱ्यांनी वेढलेल्या बदगी गावाची लोकसंख्या सुमारे एक हजार असून गावातही पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने १ कोटी ६९ लाख रुपयांची 'हर घर जल' योजना मंजूर केली आहे. मात्र या योजनेची कामे निकृष्ट दर्जाची व अपूर्ण असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. याच योजनेसाठी बेलापूर धरण परिसरात विहीर खोदून पाणीपुरवठा करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न करण्यात आला होता. परंतु, बेलापूर ग्रामस्थांनी त्यांच्या अनेक प्रलंबित मागण्या पूर्ण झाल्याशिवाय विहीर खोदण्यास परवानगी देणार नसल्याची ठाम भूमिका घेतली. ग्रामस्थांच्या संतप्त विरोधामुळे अधिकाऱ्यांना कोणतीही कारवाई न करता परतावे लागले.

या घटनेमुळे एका बाजूला पाण्यासाठी संघर्ष करणाऱ्या बदगी ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे, तर दुसऱ्या बाजूला बेलापूर ग्रामस्थांनी आपल्या हक्काच्या मागण्यांसाठी आक्रमक भूमिका कायम ठेवत प्रशासनावर दबाव वाढविला आहे. परिणामी, या प्रश्नावर प्रशासन कोणता तोडगा काढते याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे. बेलापूर ग्रामस्थांनी पाझर तलावातील गाळ तातडीने उपसा करण्यात यावा, तलावाची अधिकृत मोजणी करून सर्व अतिक्रमणे हटविण्यात यावीत, निळवंडेसह विविध धरणांतून उन्हाळ्यात बेलापूर पाझर तलावात नियमित पाण्याचे आवर्तन सोडण्यात यावे, गावात पाणीटंचाई निर्माण झाल्यास बदगी जलयोजनेच्या विहिरीत मोटार टाकण्यास परवानगी द्यावी, बेलापूर गावातील जलजीवन मिशनची रखडलेली कामे तातडीने पूर्ण करावीत, प्रस्तावित विहिरीच्या परिसरात आडवे-उभे बोअर घेण्यास बंदी घालावी, तसेच काळू-मांडवी नदीजोड प्रकल्प राबवून कच नदी बारमाही करण्यात यावी, अशा प्रमुख मागण्या प्रशासनाकडे केल्या आहेत.

# 'नॅशनल टॅलेंट हंट' मध्ये संगमनेरच्या विद्यार्थ्यांची चमकदार कामगिरी

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

पुणे येथे अखिल भारतीय कला मंच - व्हीईपीएएफ आणि एसएझेड म्युझिक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या नॅशनल टॅलेंट हंट २०२६ या राष्ट्रीय स्तरावरील कला स्पर्धेत संगमनेरच्या आर्ट बाय हार्ट अकॅडमीने उल्लेखनीय यश संपादन करत आपला ठसा उमटवला. देशभरातील विविध राज्यांतून सहभागी झालेल्या स्पर्धकांनी नृत्य, संगीत, अभिनय, वादन अशा विविध कला प्रकारांमध्ये आपल्या कलेचा उत्कृष्ट आविष्कार सादर केला. या प्रतिष्ठित स्पर्धेत अकॅडमीचे संचालक प्रशांत युवराज त्रिभुवन यांच्या मार्गदर्शनाखाली तब्बल १५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेत विविध स्पर्धांमध्ये यश मिळवले. विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे संगमनेरच्या कला क्षेत्राचा गौरव राष्ट्रीय स्तरावर झाला आहे.



वैयक्तिक स्पर्धांमध्ये क्षितिज ज्ञानदेव मुसळे याने भारतीय बासरी वादन प्रकारात प्रथम क्रमांक पटकावला, तर वैष्णवी संतोष पारधी हिने एकपात्री अभिनयात प्रथम क्रमांक मिळवून प्रेक्षकांची दाद मिळवली. लोकनृत्य प्रकारात त्रिशा सचिन कदम हिने तृतीय क्रमांक संपादन केला.

सांघिक स्पर्धांमध्ये आर्ट बाय हार्ट अकॅडमीच्या दुरी के पार या एकांकिकेने प्रथम क्रमांक मिळवला. तसेच, लोकनृत्य प्रकारातही अकॅडमीने प्रथम क्रमांक पटकावत दुहेरी यश मिळवले. विद्यार्थ्यांच्या या उज्ज्वल यशाबरोबरच अकॅडमीचे संचालक प्रशांत युवराज त्रिभुवन यांना राष्ट्रीय स्तरावरील गुरु रत्न पुरस्काराने गौरविण्यात आले. त्यांच्या सातत्यपूर्ण मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावर आपली कला सादर करण्याची संधी मिळाली.

या स्पर्धेत जान्हवी देशमुख, साईषा बाचकर, अमेय कुलकर्णी, झेद सय्यद, आरव अडांगळे, तनिष्का गुंजाळ, ईश्वरी पांडे, लक्ष्मी कासार, विराज यादव तसेच डी. बी. गायकवाड मॅडम यांनीही विविध कला प्रकारांमध्ये सहभाग घेत अकॅडमीच्या यशात मोलाचे योगदान दिले. विशेष बाब म्हणजे, या स्पर्धेतील विजयी विद्यार्थ्यांची निवड आता व्हिएतनाम येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय कला महोत्सवासाठी करण्यात आली आहे. त्यामुळे संगमनेरच्या कला विश्वात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. विद्यार्थ्यांचे कठोर परिश्रम, पालकांचे सहकार्य आणि अकॅडमीचे सातत्यपूर्ण प्रशिक्षण यामुळेच हे यश शक्य झाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती निमित्त पुरोहित प्रतिष्ठानच्या वतीने अभिवादन

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-



स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणजे देशभक्तीचा प्रचंड महाकाय धबधबा. त्याच्या प्रवाहामध्ये अत्याचारी ब्रिटिश साम्राज्य कधी वाहून गेले, हे ब्रिटिशांना देखील कळले नाही. स्वातंत्र्य चळवळीत लक्षावधी तरुणांना सक्रिय सहभाग घेण्याची प्रेरणा देणारे आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठी अतोनात हालअपेष्टा भोगणारे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर म्हणजे युवाशक्तीला दिशादर्शक अढळ ध्रुवतारा आहे. त्यांचे विचार चंद्र-सूर्य असेपर्यंत नेहमीच जिवंत राहतील व येणाऱ्या पिढ्यांना प्रखर देशभक्तीचे धडे देत राहतील. देशाच्या सीमा ओलांडून त्याही पलीकडे त्यांची कीर्ती पसरलेली आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास जगातील अनेक जिज्ञासू विद्वान करून त्यापासून प्रेरणा घेत आहेत, असे उद्गार पुरोहित प्रतिष्ठानचे अध्यक्ष भाऊ जाखडी यांनी येथे काढले. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जयंतीनिमित्त स्वातंत्र्य चौकातील वीर सावरकर

(पान नं. ४ वर)

# अधिकमास : दान, दर्शन आणि हरवलेले आत्मज्ञान

सध्या अधिकमास सुरू झाला आहे. जावा आणि गावातल्या पंढरपूरला जायचं का, म्हणून विचारत होत्या. पण पंढरपूरला चाललेली ती अथांग गर्दी आणि तिथली परिस्थिती पाहिली की, त्या गर्दीत जाऊन आपण नेमके काय करणार? असा प्रश्न मला पडल्याशिवाय राहत नाही. आज खेड्यापाड्यातून भाविकांच्या झुंडीच्या झुंडी पंढरपूरच्या दिशेने जात आहेत. १७ मे २०२६ पासून सुरू झालेल्या 'अधिक ज्येष्ठ मासा'मुळे (पुरुषोत्तम मास) सध्या महाराष्ट्रातील सर्वच प्रमुख तीर्थक्षेत्रांवर भाविकांची अभूतपूर्व गर्दी झाली आहे. गेल्या १५-२० दिवसांत धार्मिक क्षेत्रात मोठ्या घडामोडी आणि प्रचंड गर्दी पाहायला मिळत आहे. पंढरपूर विठ्ठल दर्शनासाठी अधिक मासानिमित्त दर्शनासाठी ४ किलोमीटरपर्यंत लांबच लांब रांगा लागल्या आहेत. उन्हाचा पारा ४३ अंशांच्या पार गेला असतानाही, भाविक दर्शनासाठी ८ ते १० तास रांगेत उभे राहत आहेत. तुळजापूर, आळंदी, जेजुरी आणि नाशिकच्या त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग क्षेत्रात पवित्र स्नान व दर्शनासाठी भाविकांचा मोठा ओघ वाढला आहे. सध्या जावयाला घरी बोलावून ३३ अनारसे, ३३ दिवे किंवा वस्तूंचे दान देण्याची ही लगबग प्रत्येक घरात पाहायला मिळत आहे. तसेच आईची ओटी भरण्याच्या पारंपरिक विधींना उधाण आले आहे. नुकतीच २७ मे रोजी 'कमला एकादशी' पार पडली असून, आता ३१ मे रोजी येणाऱ्या अधिक मास पूर्णिमेसाठी आणि १५ जूनच्या अमावस्येसाठी (पितृ तर्पण) तीर्थक्षेत्रांवर अधिक गर्दी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. थोडक्यात सांगायचे तर, १५ जून २०२६ पर्यंत चालणाऱ्या या अधिक मासामुळे सध्या महाराष्ट्रातील धार्मिक वातावरण पूर्णपणे विठ्ठलमय आणि भक्तिमय झाले असून, उन्हाची तमा न बाळगता भाविकांची तुफान गर्दी वाढत आहे. देवभक्ती करणे किंवा देवावर श्रद्धा असणे मुळीच चुकीचे नाही, पण आजकाल प्रत्येकच गोष्टीचा अत्यंत अतिरेक होत चालला आहे. पंढरपूरला जाणाऱ्या या गर्दीला पाहिले की, असे वाटते की, तिथे बारीला मोठाल्या रांगा, जाऊन गर्दीत कसेबसे डोके टेकवून दर्शन घेणे, चंद्रभागेत आंघोळ करणे, तिथल्या कोलाहलात थोडेफार भजन-पूजन ऐकणे आणि मठामध्ये पुरणपोळ्यांचा स्वयंपाक करून एकत्र बसून खाणे, एवढ्याच गोष्टी करणे म्हणजे परमार्थ आणि अध्यात्म आहे का? हा केवळ एक कौटुंबिक सोहळा किंवा मानसिक समाधानाचा मार्ग असू शकतो, पण यालाच जर आपण धर्म किंवा अध्यात्माचा अंतिम उद्देश मानणार असू, तर आपण संतांच्या महाराष्ट्रात असूनही अध्यात्माच्या मूळ गाभ्यापासून खूप दूर जात आहोत, हे मान्य करावेच लागेल.

दर तीन वर्षांनी येणारा हा अधिकमास (पुरुषोत्तम मास), ज्याचे मूळ प्रयोजन खगोलीय गणितातील फरक भरून काढणे आणि त्या निमित्ताने मानवी जीवनाला एक आध्यात्मिक विश्रांती देणे हे होते, तो आज केवळ अशा यांत्रिक कर्मकांडांमध्ये आणि एका व्यावसायिक उत्सवामध्ये रूपांतरित झाला आहे. या तीर्थक्षेत्रांकडे धावणाऱ्या गरीब आणि अज्ञानी गर्दीच्या मानसशास्त्राचा विचार केला, तर असे दिसून येते की, माणसाला स्वतःच्या जगण्यातील अपूर्णतेमुळे आणि रोजच्या जगण्याच्या संघर्षातून येणाऱ्या थकव्यामुळे एका तात्पुरत्या मानसिक समाधानाची नितांत गरज असते. माणूस जेव्हा अशा यात्रा करतो, ३३ अनारसे किंवा दिवे दान करतो आणि मैलोनमैल पायी चालतो, तेव्हा त्याच्या मनाला एक वरवरचे आणि फसवे समाधान मिळते. त्याला वाटते की, मी देवभक्ती करत आहे, मी या जन्मात खूप मोठे पुण्य कमावले आहे आणि मी काहीतरी विशेष करीत आहे. परंतु, हा विचारच मुळात एका सूक्ष्म आणि अत्यंत धोकादायक अशा आध्यात्मिक अहंकाराला जन्म देतो. माझ्यासारखा भक्त मीच ही सुप्त भावना मनात घर करते, जी माणसाला अधिक नम्र आणि शांत बनवण्याऐवजी अधिक संकुचित बनवते. संत तुकाराम महाराजांनी दगडाच्या देवाला शोधणाऱ्या या वृत्तीवर प्रहार करताना स्पष्ट सांगितले होते की, देव तीर्थक्षेत्रांच्या धोंड्यापाण्यात नसून, तो सज्जनांच्या आणि माणसाच्या हृदयात वास करतो. परंतु, आपण माणसातील देवाचा शोध घेण्याऐवजी, मंदिरातील मूर्तीला प्रसन्न करण्यासाठी स्वतःच्या शरीराचे, पैशाचे आणि वेळेचे अतोनात शोषण करत राहतो, ज्यातून केवळ क्षणिक शांतता लाभते, पण मनातील अज्ञान तसेच राहते.



वास्तविक पाहता, आजचा धर्म हा बहुतांश वेळा केवळ 'मागण्यांवर' आणि 'भयाच्या' व्यापारावर आधारित असलेला दिसतो. मी तुला नवस करतो, तू माझे काम कर; मी तुला ३३ वस्तूंचे दान करतो, तू मला पुढच्या जन्मी सुख दे, ही भक्ती नसून एक प्रकारची देवाशी केलेली देवाणघेवाण किंवा व्यापार आहे. या बाह्य उपचारांमुळे माणसाला मिळणारा मानसिक दिलासा हा एखाद्या वेदनाशामक गोळीसारखा असतो, जो तात्पुरते दुःख विसरवायला लावतो, परंतु मनातील मूळ व्याधी, लोभ, मत्सर, भय आणि अज्ञान, तशीच जिवंत ठेवतो. आज कॉर्पोरेट जगाप्रमाणेच धर्माचेही एका मोठ्या प्रमाणावर 'इव्हेंट मॅनेजमेंट' झाले आहे. अधिकमास हा आता आत्मपरीक्षणाचा आणि साधनेचा काळ राहिला नसून, तो एक मोठा व्यावसायिक मोसम झाला आहे, जिथे व्हीआयपी दर्शनाचे पासेस, महागाईची वाणे आणि पर्यटनाच्या नावाखाली होणारी गर्दी, यांमुळे तीर्थक्षेत्रांचे मूळ पावित्र्यच नष्ट झाले आहे. 'धर्म' हा मुळात माणसाला बंधनातून आणि भ्रमातून मुक्त करण्यासाठी निर्माण झाला होता, पण आज तोच माणसाला नव्या रूढी, परंपरा आणि कर्मकांडाच्या साखळीत अधिक घट्ट अडकवत आहे, ज्यामुळे सर्वसामान्य माणूस आपली विवेकबुद्धी गमावून बसतो.

भगवद्गीतेचा १५ वा अध्याय, म्हणजेच 'पुरुषोत्तम योग', मानवी मनाला अत्यंत सखोल मानसिक शांतता आणि जगण्याचा खरा दृष्टिकोन देणारा मानला जातो. हा अध्याय आपल्या मनातील चिंता दूर करून शांतता कशी मिळवून देतो, हे सांगतो. संसाराचे 'उफराटे झाड' (अश्वत्थ वृक्ष) आणि मानसिक मुक्ती. या अध्यायाची सुरुवात एका आगळ्यावेगळ्या रूपकाने होते. श्रीकृष्ण संसाराची तुलना एका उलट्या (ज्यांची मुळे वर आणि फांद्या खाली आहेत अशा) 'अश्वत्थ' (पिंपळाच्या) वृक्षाशी करतात. आपली मुळे (विचार, वासना, आसक्ती) वर स्वर्गात किंवा कर्मात अडकलेली आहेत आणि आपण खाली जगात सुख शोधत आहोत. जेव्हा माणसाला हे समजते की, हा संसार नाशवंत आणि सतत बदलणारा आहे, तेव्हा त्याच्या मनातील अपेक्षा आणि भविष्याची भीती संपते. 'निसर्गाचा नियमच बदलणे आहे,' हे स्वीकारल्यामुळे मनाला प्रचंड शांतता लाभते. श्रीकृष्ण सांगतात की, या संसाराच्या झाडाला कापण्यासाठी एकच शस्त्र आहे, ते म्हणजे 'असंगशस्त्र' (वैराग्य किंवा अलिप्तता). आज आपल्या मानसिक अशांततेचे मुख्य कारण म्हणजे, 'माझे काय होईल?', 'मला हे मिळालेच पाहिजे,' हा अट्टाहास. भगवद्गीता शिकवते की, कर्तव्याचा त्याग न करता फळाच्या आशेपासून अलिप्त राहणे अत्यंत गरजेचे आहे. जेव्हा आपण गोष्टींना घट्ट धरून ठेवणे सोडतो, तेव्हा मन चिंतामुक्त होते. अध्यायाच्या शेवटी 'पुरुषोत्तम' तत्त्व सांगितले आहे. आपले शरीर नाशवंत (क्षर) आहे, आपला आत्मा अविनाशी (अक्षर) आहे, पण या दोन्हीच्या पलीकडे एक सर्वोच्च आनंदमय शक्ती आहे, ती म्हणजे 'पुरुषोत्तम'. अधिक मासात (कालचक्रातील तांत्रिक कारणामुळे = एक्स्ट्रा मिळालेला काळ... आणि त्याचा आत्मशोधनासाठी सदुपयोग करून घेणे हाच उद्देश) या अध्यायाचे चिंतन केल्याने माणसाला समजते की, बाह्य जगातील चढ-उतार तात्पुरते आहेत; खऱ्या सुखाचा स्त्रोत आपल्या आतच आहे.

अध्यात्माचा खरा, अंतिम आणि एकमेव उद्देश हा 'आत्मज्ञान', म्हणजेच स्वतःला ओळखणे, मन, वृत्ती, मनाचा स्वभाव या सर्वांचे आकलन करणे, त्या ज्ञानातून आत्मपरीक्षण करणे आणि त्या शांततेत घेतलेला स्वतःचा शोध हा आहे. रोजच्या सांसारिक जगाच्या कोलाहलातून आणि धावपळीतून काही काळासाठी बाजूला होऊन अंतर्मुख होणे, स्वतःच्या गुणांचे आणि दोषांचे परीक्षण करणे म्हणजे खरा अधिकमास साजरा करणे होय. बाजारातून विकत आणलेले ३३ अनारसे किंवा वस्तू दान करण्यापेक्षा, स्वतःच्या मनातील काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर यांसारख्या ३३ दुर्गुणांचा आणि विकृतींचा त्याग करणे, हे सर्वात मोठे महादान आहे. जोपर्यंत गर्दीत धावणारा प्रत्येक माणूस स्वतःपाशी क्षणभर थांबत नाही, तोपर्यंत त्याला बाह्य जगात किंवा पंढरपूरच्या गर्दीत विठ्ठल कधीच सापडणार नाही. संत गाडगे बाबांनी आयुष्यभर कोणत्याही देवळात न जाता, हातात झाडू धरून गोरगरिबांची आणि समाजाची सेवा केली, कारण त्यांना अध्यात्माचा हा मूळ गाभा अचूक समजला होता. जोपर्यंत धर्म हा तीर्थक्षेत्रांच्या बाजारातून आणि कर्मकांडाच्या चौकटीतून बाहेर पडून माणसाच्या विवेकबुद्धीमध्ये आणि आचरणात प्रवेश करत नाही, तोपर्यंत असे अनेक अधिकमास येत राहतील, भाविकांच्या झुंडीच्या झुंडी गर्दी करत राहतील, परंतु माणसाचे अज्ञान, दुःख आणि शोषणाचे हे दुष्टचक्र कधीच संपणार नाही; कारण खरी भक्ती आणि आत्म्याचा शोध हा बाहेरच्या गोंगाटात नसून, अंतरीच्या शांततेत असतो.



– मीरा साठे

# संपादकीय...

## प्रगतीच्या घोषणांमागे सामान्य माणसाचे वास्तव

भारताच्या विकासाचा विचार केला की, सर्वप्रथम डोळ्यासमोर येते ती वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था, उंचावणारे महामार्ग, डिजिटल व्यवहारांची वाढ आणि जागतिक स्तरावर निर्माण झालेली आर्थिक ओळख. परंतु या विकासाच्या चमकदार चित्रामागे एक मूलभूत प्रश्न कायम उभा राहतो, तो म्हणजे या विकासाचा खरा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचतो आहे का? देशाची अर्थव्यवस्था वाढत असताना सर्वसामान्य नागरिकांचे जीवन अधिक सुसह्य, सुरक्षित आणि समतोल होत आहे का? या प्रश्नांची उत्तरे शोधताना एक गोष्ट स्पष्टपणे समोर येते की, केवळ आर्थिक वाढ पुरेशी नसते; त्या वाढीचे स्वरूप, तिचे वितरण आणि तिच्या अंमलबजावणीमागील संस्थात्मक रचना अधिक महत्त्वाची असते. कोणत्याही राष्ट्राचा विकास हा केवळ भांडवल, उद्योग किंवा तंत्रज्ञानावर उभा राहत नाही, तर त्या सर्वांना दिशा देणाऱ्या संस्था, प्रशासन आणि उत्तरदायी व्यवस्थांवर उभा राहतो. संस्था सक्षम असतील, तर विकास व्यापक होतो; संस्था कमकुवत असतील, तर विकास काही हातांपुरताच मर्यादित राहतो. भारतासमोरील आजचे मोठे आव्हान हे आर्थिक क्षमतेच्या अभावाचे नसून संस्थात्मक कार्यक्षमतेतील तुटीचे आहे. प्रशासनातील विलंब, भ्रष्टाचार, नियामक अनिश्चितता, प्रकल्प मंजुरीतील अडथळे, न्यायालयीन खटल्यांचा ढिगारा आणि सेवा वितरणातील असमानता या समस्या विकासाचा वेग कमी करत आहेत. एखाद्या उद्योगाला परवानगी मिळण्यासाठी अनेक स्तरांवर फेऱ्या माराव्या लागतात, जमीन अधिग्रहण वर्षानुवर्षे अडकून राहते, न्यायालयीन वाद दशकानुदशके प्रलंबित राहतात आणि नागरिकांना मूलभूत सेवांसाठीही संघर्ष करावा लागतो, तेव्हा आर्थिक वाढीचा लाभ व्यापक समाजापर्यंत पोहोचत नाही. संस्थात्मक गुणवत्तेचा परिणाम केवळ कागदावरील आकडेवारीत दिसत नाही, तर तो थेट नागरिकांच्या दैनंदिन अनुभवात जाणवतो. एखाद्या शेतकऱ्याला अनुदान मिळण्यात होणारा विलंब, एखाद्या विद्यार्थ्याला शिष्यवृत्ती मिळवण्यासाठी करावा लागणारा पाठपुरावा, रुग्णालयांतील व्यवस्थेतील त्रुटी किंवा नागरी सेवांमधील अकार्यक्षमता या सगळ्या गोष्टी संस्थात्मक गुणवत्तेचे वास्तव दर्शवतात. म्हणूनच संस्था केवळ प्रशासन चालवत नाहीत, तर त्या समाजातील संधी, समानता आणि न्याय यांचेही स्वरूप ठरवतात. भारताच्या संस्थात्मक समस्यांचा विचार करताना त्याच्या वसाहतवादी इतिहासाकडे दुर्लक्ष करता येत नाही. ब्रिटिश राजवटीने भारतात उभारलेली प्रशासकीय यंत्रणा ही लोककल्याणासाठी नव्हे, तर संसाधनांच्या शोषणासाठी तयार करण्यात आली होती. जमीन महसूल वसुली, नियंत्रण आणि सत्ता टिकवणे हेच तिचे मुख्य उद्दिष्ट होते. परिणामी, लोकाभिमुख आणि उत्तरदायी संस्था निर्माण होण्याऐवजी नियंत्रणवादी, श्रेणीबद्ध आणि केंद्रीकृत व्यवस्था तयार झाली. आजही भारतीय नोकरशाहीतील अनेक वैशिष्ट्यांमध्ये त्या काळाचे प्रतिबिंब दिसून येते. अधिकारकेंद्री दृष्टिकोन, नियमांची गुंतागुंत, निर्णय प्रक्रियेतील विलंब आणि नागरिकांकडे संशयाने पाहण्याची प्रवृत्ती या गोष्टी त्याच वारशाचा भाग आहेत. स्वातंत्र्यानंतर भारताने लोकशाही, संविधान आणि विकासाच्या माध्यमातून या रचनेत बदल घडवण्याचा प्रयत्न केला, परंतु अनेक ठिकाणी जुन्या व्यवस्थेची मानसिकता कायम राहिली. त्यामुळे विकासाच्या योजना मोठ्या प्रमाणावर तयार होतात, निधीही उपलब्ध होतो, पण अंमलबजावणीच्या टप्प्यावर प्रणालीतील अकार्यक्षमता अडथळा ठरते. आज भारत जगातील सर्वाधिक वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे, परंतु प्रतिव्यक्ती उत्पन्न, आरोग्य, शिक्षण, न्यायव्यवस्था आणि सेवा वितरण या बाबतीत अजूनही अनेक विकसनशील देशांच्या मागे आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे आर्थिक वाढीला सामाजिक आणि संस्थात्मक आधार पुरेशा प्रमाणात मिळालेला नाही. आर्थिक प्रगती व्यापक स्वरूपात घडवायची असेल, तर संस्थात्मक सुधारणांना केंद्रस्थानी आणावे लागेल. गुणवत्ताधारित प्रशासन, पारदर्शक व्यवस्था, भ्रष्टाचारविरोधी कठोर यंत्रणा, वेगवान न्यायप्रक्रिया आणि उत्तरदायी धोरण अंमलबजावणी यांशिवाय समतोल विकास साध्य होऊ शकत नाही. जगातील अनेक देशांनी हे सिद्ध केले आहे की, मजबूत संस्था असतील तर मर्यादित संसाधनांमध्येही टिकाऊ विकास साधता येतो. बोत्सवाना, चिली किंवा व्हिएतनाम यांसारख्या देशांनी संस्थात्मक सुधारणांच्या माध्यमातून आर्थिक परिवर्तन घडवून आणले.

# माजी मंत्री थोरातांकडून ठोंबरे कुटुंबीयांचे सांत्वन



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)

संगमनेर तालुक्यातील पिंपरने येथील मूळ रहिवासी असलेले सचिन ठोंबरे व त्यांची पत्नी रोहिणी ठोंबरे, आणि त्यांच्या समवेत शेजारी राहत असलेले केतन व कौशल्य, या चौघांचा मंगळवारी कश्यपी धरणात बुडून मृत्यू झाल्याने संपूर्ण तालुक्यात मोठी हळहळ पसरली. माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी पिंपरने येथे ठोंबरे कुटुंबीयांची भेट घेत सांत्वन केले, तर ही अत्यंत दुर्दैवी घटना हृदय हेलावून टाकणारी असल्याचे त्यांनी म्हटले आहे. यावेळी समवेत ज्येष्ठ नेते सुधाकर रोहम, शरद नाना थोरात, अण्णासाहेब राहींज, दादासाहेब देशमुख, राजेंद्र देशमुख, बाबासाहेब राहींज, दिनकर वाकचौरे, देवराम वाकचौरे, नंदू ठोंबरे, संजय बागुल, अरुण देशमुख, प्रसाद मांडे, भास्कर ठोंबरे, प्रभाकर ठोंबरे, कृष्णा काळे, संजय ठोंबरे यांच्यासह गावातील कार्यकर्ते व युवक उपस्थित होते. बाळासाहेब थोरात यांनी मयत सचिन यांची आई श्रीमती ताराबाई, भाऊ योगेश ठोंबरे यांच्यासह सर्व कुटुंबीयांची भेट घेत सांत्वन केले.

नाशिक जिल्ह्यातील म्हसरूळ मखमलाबाद परिसरात वास्तव्यास असणारे सिव्हिल इंजिनीयर सचिन ठोंबरे आपल्या कुटुंबीयांसह सुट्टी निमित्त हरसुल त्र्यंबकेश्वर जवळील कश्यपी धरणावर फिरण्यासाठी गेले. सायंकाळच्या वेळेस पोहण्यासाठी पाण्यात गेले असताना, त्यांना खोल पाण्याचा अंदाज न आल्याने सचिन ठोंबरे यांच्या पत्नी सौ. रोहिणी ठोंबरे व त्यांच्या शेजारी राहत असलेले, व त्यांच्या समवेत फिरण्यासाठी आलेले केतन व कौशल पवार हे बंधू पाण्यात बुडाले. ठोंबरे दाम्पत्याची अवघी दोन वर्षांची चिमुकली पाण्याच्या बाहेर असल्याने रडत होती. यावेळी शेजारून जाणाऱ्या संगीता घाडगे या महिलेने या लहान मुलीला पाहिल्याने, त्यांनी धावत मुलीला वाचवले. याचबरोबर या घटनेची माहिती स्थानिकांना दिली. स्थानिकांनी अनेक प्रयत्न केले, मात्र तत्पूर्वी या चौघांचेही मृत्यू झाले होते. या घटनेची बातमी समजताच पिंपरनेसह संपूर्ण संगमनेर तालुक्यात व जिल्ह्यात मोठी हळहळ निर्माण झाली.

माजी मंत्री थोरात म्हणाले की, झालेली घटना ही अत्यंत दुर्दैवी आणि हृदय हेलावून टाकणारी आहे. प्रत्येकाने काळजी घेणे हे अत्यंत महत्त्वाचे असून, या कुटुंबीयाला जास्तीत जास्त मदत मिळावी याकरता शासकीय यंत्रणेला सूचना केल्या आहेत.

# आमदार अमोल खताळांकडून सानप कुटुंबीयांचे सांत्वन



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

संगमनेर तालुक्यातील तिगाव येथे दगडाच्या खाणीत साचलेल्या पाण्यात पोहण्यासाठी गेलेल्या दोन सख्ख्या भावांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना शुक्रवारी (दि. २२) घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे. या दुर्घटनेची माहिती मिळताच आमदार अमोल खताळ यांनी शनिवारी (दि. २३) दुपारी तिगाव येथे जाऊन सानप कुटुंबीयांची भेट घेत त्यांचे सांत्वन केले.

महेश गोरक्षनाथ सानप (वय - १८) आणि ओंकार गोरक्षनाथ सानप (वय - १४) अशी पाण्यात बुडून मृत्यू झालेल्या भावांची नावे आहेत. यावेळी आमदार खताळ यांनी मृत मुलांच्या कुटुंबीयांना धीर देताना, या दुःखद प्रसंगी आम्ही सर्वजण तुमच्या पाठीशी आहोत, असे सांगितले. तसेच शासन स्तरावरून मिळणारी आर्थिक मदत, तसेच विविध योजनांमधून शक्य ती सर्व मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासनही त्यांनी दिले.

घटनेच्या अनुषंगाने आमदार खताळ यांनी तहसीलदार धीरज मांजरे यांच्याशी चर्चा करून दुर्घटनेची सविस्तर माहिती घेण्याच्या सूचना दिल्या. तसेच संबंधित प्रशासनाने तत्काळ पंचनामा व इतर आवश्यक कार्यवाही पूर्ण करून कुटुंबीयांना मदत मिळवून द्यावी, असे निर्देशही त्यांनी दिले. या प्रसंगी ग्रामस्थ, महायुतीचे पदाधिकारी, सानप परिवाराचे नातेवाईक, तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'संदेश कॉम्प्युटर्स'च्या विद्यार्थ्यांची आनंदगड येथे शैक्षणिक सहल



अकोले (युवावार्ता प्रतिनिधी)-

विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण मिळावे, या उद्देशाने अकोले येथील अग्रगण्य संगणक प्रशिक्षण संस्था 'संदेश कॉम्प्युटर्स'च्या वतीने एम.एस.सी.आय.टी. (एमएस-सीआयटी) कोर्सच्या विद्यार्थ्यांसाठी 'आनंदगड' या नामांकित शैक्षणिक संकुलात एक दिवसीय शैक्षणिक सहलीचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांची माहिती घेत प्रत्यक्ष अनुभव मिळवला.

या शैक्षणिक भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी आनंदगड संकुलातील पॉलिटेक्निक कॉलेज, डिप्लोमा आणि फार्मसी (औषधनिर्माणशास्त्र) कॉलेजला भेट देऊन माहिती घेतली. संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब वाकचौरे, सेक्रेटरी डॉ. अनिल रहाणे यांच्या मार्गदर्शनाखाली चालू असलेल्या महाविद्यालयांमधील अत्याधुनिक प्रयोगशाळा (लॅब्स), भव्य ग्रंथालय आणि शैक्षणिक पायाभूत सुविधा पाहून विद्यार्थी भारावून गेले. विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञान आणि वैद्यकीय क्षेत्रातील करिअरच्या विविध संधी समजून घेतल्या. तसेच संबंधित कॉलेजच्या तज्ज्ञ प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रिया (डमिशन प्रोसेस), पात्रता आणि भविष्यातील रोजगाराच्या संधींविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब वाकचौरे व सेक्रेटरी डॉ. अनिल रहाणे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच पॉलिटेक्निक कॉलेजचे को-ऑर्डीनेटर विद्याचंद्र सातपुते यांनीही विद्यार्थ्यांना आजच्या डिजिटल युगात संगणक साक्षरतेसोबतच उच्च शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. स्पर्धेच्या युगात युवकांच्या हातात कौशल्य असण्याची गरज असून, त्यासाठी तंत्रज्ञानाशिवाय पर्याय नसल्याचे त्यांनी सांगितले व संदेश कॉम्प्युटर्सच्या या उपक्रमाचे कौतुक केले. यावेळी प्रा. संदीप थोरात यांनी संस्थेत सुरू असलेल्या अभ्यासक्रमांची माहिती दिली.

या शैक्षणिक सहलीचे नेटके नियोजन करण्यासाठी संदेश कॉम्प्युटर्सचे संचालक श्री. हेमंत मोरे यांनी सहकार्य केले. आनंदगड शैक्षणिक संकुलाच्या वतीने विद्यार्थ्यांच्या भेटीसाठी बस व चहा-नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली. या प्रसंगी संस्थेच्या उपप्राचार्या प्रा. प्राजक्ता आंबरे, प्रा. संदीप थोरात, प्रा. पूजा शेळके, प्रा. अजित येलमामे, प्रा. अक्षय घोडगे, तंत्रज्ञ आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. भविष्यात करिअरची निवड करताना या शैक्षणिक सहलीचा मोठा फायदा होणार असल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले. प्रत्यक्ष कॉलेजला भेट देऊन प्रवेशासंदर्भातील शंकांचे निरसन झाल्यामुळे सर्वच विद्यार्थ्यांनी संदेश कॉम्प्युटर्सचे आभार मानले. ही सहल अत्यंत उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात संपन्न झाली.

# स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती...(पान ४ वरून)

स्मारकात आयोजित करण्यात आलेल्या अभिवादन कार्यक्रमात बोलताना त्यांनी हे प्रतिपादन केले. ब्रिटिश सरकारला आपल्या अलौकिक क्रांतीकार्याने 'सळो की पळो' करून सोडणाऱ्या स्वातंत्र्यवीर सावरकरांचे अवघे जीवन म्हणजे भारतवर्षाला नेहमी प्रेरणा देत राहणारा प्रखर देशभक्तीचा प्रेरणादायी झरा आहे. तरुणांनी सावरकरांच्या मार्गाने जाण्याचा निर्धार केल्यास भारताकडे वाकडी नजर करून पाहण्याचे कोणाचेही धाडस होणार नाही, असे परखड प्रतिपादन पुरोहित संघाचे अध्यक्ष भाऊ जाखडी यांनी येथे केले.

प्रचंड इच्छाशक्तीच्या बळावर 'अभिनव भारत' संघटनेच्या माध्यमातून त्यांनी देशभक्त युवकांची फळी उभारली. त्यांच्या ओजस्वी व्याख्यानांनी आणि सडेतोड लिखाणाने ब्रिटिश सत्तेला हादरवून टाकले. देशासाठी परिवाराची प्रचंड हानी तर सावरकरांनी सोसलीच, परंतु काळ्या पाण्याची कठोर अमानवी शिक्षाही देशासाठी हसत-हसत भोगली. अस्पृश्योद्धाराचे ऐतिहासिक कार्य केले. अनेक महाकाव्ये आणि स्फूर्तीदायी ग्रंथ तसेच गीते, पोवाडे यांची रचना केली. अखेरच्या श्वासापर्यंत ज्यांचे कर राष्ट्राला सावरण्यासाठी सतत कार्यरत राहिले, ते अद्भुत मूर्तीमंत देशभक्तीचे रूप म्हणजे सावरकर. मराठी भाषेला अनेक सहज-सोप्या शब्दांची देणगी त्यांनी दिली. क्रांतिकारकांचे मुकुटमणी ठरलेले सावरकर म्हणजे 'आपले राष्ट्र सर्वात श्रेष्ठ' बनविणारी आणि कधीही न संपणारी समृद्ध वैचारिक शिदोरी आहे, अशा शब्दांत जाखडी यांनी सावरकरांचे व्यक्तिमत्त्व शब्दातून उभे केले.

पुरोहित संघाच्या वतीने जाखडी यांनी पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला. यावेळी उपाध्यक्ष संदीप वैद्य, उमेश जोशी, अरुण कुलकर्णी, प्रतिक जोशी, पवन काळे, शंतनू जाखडी, योगेश म्हाळस गुरुजी यांचेसह समाजाच्या सर्व स्तरातील नागरिक उपस्थित होते.


## भाड्याने देणे आहे

**संगमनेर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी**

**२००० स्क्वेअर फिट ३ मजले, एकूण ६००० स्क्वेअर फिट बांधकाम असलेली प्रशस्त इमारत भाड्याने देणे आहे**

- पिण्यासाठी नगरपालिकेचे नळ कनेक्शन
- वापरासाठी स्वतंत्र बोरिंग सुविधा
- थ्री फेज लाईट कनेक्शन उपलब्ध
- व्यवसाय, ऑफिस, क्लासेस, हॉस्पिटल, इत्यादींसाठी उत्तम जागा

**पत्ता :** नाशिक – पुणे हायवे, सह्याद्री कॉलेजच्या पाठीमागे, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अ.नगर

- संपर्क - **9822258458**


## जाहिर नोटीस


तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत ही जि. अहिल्यानगर, ता. संगमनेर पैकी मौजे घुलेवाडी शिवारातील सर्व्हे नं. २२२/३४/३ हि मिळकत आमचे अशिल नामे श्री. दिनकर शांताराम मंडलिक व श्री. रघुनाथ भिकाजी गाडेकर यांनी दि. ०५/०५/२०२५ रोजी खरेदीखत दस्त नं. ३२४०/२०२५ अन्वये खरेदी केलेली आहे.

सदर मालमत्तेचे जुने साखळी ओरिजनल खरेदीखत दस्त नं. ६३४/२०१८ व चुकदुरुस्ती दस्त नं. ६५७/२०१८ हे आमचे अशिलाकडुन नजर चुकीने गहाळ झालेले आहे. सदरचे चुक दुरुस्ती व खरेदीखत कोणाला सापडल्यास नोटीस पारित केल्यापासुन सात दिवसाचे आत सदरचे खरेदीखत व चुकदुरुस्ती दस्त हा खालील पत्यावर आणुन द्यावे अथवा मोबाईल नंबरवर संपर्क साधावा, हि नम्र विनंती.

**स्थळ – संगमनेर.**
**दिनांक. २९/०५/२०२६**

**ॲड. अनिल निवृत्ती गोडसे**
**रा. राजापुर, ता. संगमनेर**
**जि. अहिल्यानगर**
**मो. नं. ९४२२७३८१६३**


युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता



**पाहिजेत**

**अकाऊंटंट | जागा ०२**

टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक,
अनुभव : ३ वर्षे

आकर्षक पगार व इतर सुविधा

बायोडाटा पाठवा - ९८२२०३९४६०
dailyyuvavarta@gmail.com

वाटचाल तीन दशकांची







**BiZ INTERNATIONAL** FLUSH DOORS BLOCK BOARDS PLYWOODS

**WALK-IN INTERVIEW**

BiZ International कंपनीच्या ऑफिस व फॅक्टरीसाठी
**खालील पदांची त्वरित भरती करणे आहे**

1. **Sales & Service Coordinator** (संगमनेर ऑफिस)
   - Exp: 1-2 Years (Office Admin)
   - Skills: MS Office, Customer Handling, Lead Generation
   - Edu: Graduation / Diploma
2. **Service Coordinator** (पुणे लोकेशन)
   - Education: Graduate / Diploma
   - Experience: 1-2 Years (Service/Client Coordinator)
   - Skills: MS Office, Good Communication, Customer Service
3. **Purchase Entry Executive**
   - Education: Any Graduate
   - Experience: 1-2 Years (Data/Purchase Entry)
   - Skills: MS Excel, Computer Typing, Accuracy

संपर्क (Call us): **8668697302 8888801889**

## पाहिजेत

होलसेल मेडीकल दुकान कामासाठी मुले पाहिजेत
इंग्रजीचे ज्ञान आवश्यक
आकर्षक पगार
संपर्क- ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
**9730042410**

## पाहिजेत

**मेडिकल दुकानासाठी महिला व मुले पाहिजे**
प्रभात मेडिकल, नवीन नगर रोड, ताजने मळा, संगमनेर
**9921245753**

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME FATEMA BEGUM JAMALUDDIN KHATIB
TO NEW NAME AS FATEMA JAMALUDDIN KHATIB
R/O. PUNA NAKA JAVAL, NAIKWADPURA, SANGAMNER, DIST - AHILYANAGAR-422605

## पाहिजेत

डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
**माधवबाग क्लिनिक ९३२५०२८६८६**

# समनापूर पाणीपुरवठा योजनेचा वीजपुरवठा अखेर सुरळीत; गावाला दररोज मिळणार पाणी

संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-

तालुक्यातील समनापूर गावासह वाड्यावस्त्यांवर पाणीटंचाईमुळे आठवडाभर पाणी येत नव्हते. पाणीपुरवठा योजनेचा वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने ग्रामस्थांचे मोठे हाल होत होते. मात्र, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार अमोल खताळ यांच्या सूचनेनंतर अवघ्या ४ ते ५ दिवसांत महावितरणने योजनेचा वीजपुरवठा २४ तास सुरळीत केला आहे. त्यामुळे भर उन्हाळ्यात गावाला दररोज पाणी मिळण्यास सुरुवात झाली आहे.

संगमनेर येथे झालेल्या पाणीटंचाई आढावा बैठकीत शिवसेनेचे उपतालुकाप्रमुख रणजित जाधव यांनी मंत्री विखे पाटील, आमदार खताळ आणि भाजपचे तालुका सरचिटणीस संपत गेठे यांच्यासमोर गावाची व्यथा मांडली होती. यापूर्वी योजनेला केवळ ६ तास वीजपुरवठा होत असल्याने ७ ते ८ दिवसांतून एकदाच पाणी येत होते. या गंभीर बाबीची दखल घेत मंत्री विखे पाटील यांनी महावितरण अधिकाऱ्यांना तातडीने वीजपुरवठा सुरळीत करण्याचे निर्देश दिले. त्यानंतर महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी निंबाळे शिवारातून जाणाऱ्या वीज लाईनचे काम युद्धपातळीवर एका आठवड्यात पूर्ण केले.

वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. यावेळी समनापूरचे ज्येष्ठ नेते म्हतू शरमाळे, माजी सरपंच भाऊसाहेब शेरमाळे, रामनाथ केसकर, राजेंद्र गायकवाड, रणजित जाधव, संपत गेठे, समन्वयक सुनील चांडे, राहुल पकळे, एकनाथ शेरमाळे, संदीप शेरमाळे, राजेश शेरमाळे, रावसाहेब शेरमाळे, भागा शेरमाळे, मनोज भास्कर, मच्छिंद्र शेरमाळे, बापू दळवी, देवेंद्र साळवे यांच्यासह ग्रामपंचायत अधिकारी दत्तात्रय रोडे प्रत्यक्ष उपस्थित होते. गेल्या ४० वर्षांपासून प्रलंबित असलेला हा पाणीपुरवठ्याचा प्रश्न आता मार्गी लागला आहे. पाणीपुरवठा योजनेसाठी २४ तास वीज उपलब्ध झाल्याने गावातील सर्व वाड्यावस्त्यांवर दररोज पाणीपुरवठा होत असून, ग्रामस्थांनी मोठा आनंद आणि समाधान व्यक्त केले आहे.

# श्रीरामपुरात अल्पवयीन मुलावर अनैसर्गिक अत्याचार

श्रीरामपुर
(युवावार्ता प्रतिनिधी)-

श्रीरामपुरात अल्पवयीन पोरावर अनैसर्गिक अत्याचार... श्रीरामपूर - अल्पवयीन मुलाशी मैत्री करून त्याच्यावर अनैसर्गिक लैंगिक अत्याचार केल्याचा तसेच त्याचे अश्लील व्हिडिओ चित्रिकरण करून ते व्हायरल करण्याची धमकी देत वारंवार शोषण केल्याचा धक्कादायक प्रकार शहरात उघडकीस आला आहे. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात ०५ जणांविरुद्ध भारतीय न्यायसंहिता व पॉक्सो कायद्यांतर्गत गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



दरम्यान पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार संबंधित अल्पवयीन पोराच्या फिर्यादीवरून सलमान,अली अब्बास,सलीम,रहीम,इराणी या पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.हे सर्वजण येथील इराणी गल्ली परिसरातील रहिवासी आहेत. सन २०२४ पासून ते आजपर्यंत आरोपी सलमान व अली अब्बास यांनी फिर्यादी पोराशी मैत्री करून त्याच्यासोबत अनैसर्गिक लैंगिक संबंध ठेवले.यावेळी त्याच्या मोबाईलमध्ये व्हिडिओ काढण्यात आले.

हे व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत आरोपींनी वारंवार बळजबरीने अत्याचार केल्याचा आरोप फिर्यादित करण्यात आला आहे. तसेच फिर्यादीच्या नातेवाईक मुलीने आरोपींविरोधात दिलेली तक्रार मागे घेण्यासाठी दबाव टाकण्यात आला. तक्रार मागे घेतली नाही तर फिर्यादीचा व्हिडिओ व्हायरल करू अशी धमकी आरोपी सलीम ,रहीम,इराणी यांनी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.तक्रार मागे न घेतल्याने संबंधित व्हिडिओ व्हायरल करून फिर्यादीची बदनामी केल्याचाही आरोप आहे.या प्रकरणी पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अप्पासाहेब हंडाळ करीत असून या विचित्र प्रकाराने शहरात खळबळ उडाली आहे.

# महंत स्वामी श्री रामगिरीजी महाराजांच्या काल्याच्या कीर्तनाने अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

शिबलापूर (युवावार्ता प्रतिनिधी)-

संगमनेर तालुक्यातील चणेगाव येथे पुरुषोत्तम मासानिमित्त समस्त ग्रामस्थांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची गुरुवर्य महंत स्वामी श्री रामगिरीजी महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने भक्तिमय वातावरणात सांगता झाली. सप्ताहादरम्यान ग्रामस्वच्छता, पर्यावरण संरक्षण, सामाजिक सलोखा आणि कृषी विषयक जनजागृती यांसारखे विविध उपक्रम राबविण्यात आले. काकडा भजन, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, हरिपाठ, तसेच जाहीर हरिकीर्तनांचे कार्यक्रम उत्साहात पार पडले. सप्ताहकाळात संपूर्ण चणेगाव परिसर भक्तीरसात न्हाऊन निघाला होता. गावातील घराघरांत चैतन्यमय वातावरण निर्माण झाले होते. लेकी-जावयांना निमंत्रित करून दारोदारी सडा, रांगोळी व पुष्पवृष्टीद्वारे संत-महंतांचे औक्षण करून स्वागत करण्यात आले.



सप्ताहाचा शुभारंभ उंबरेश्वर देवस्थानचे मठाधिपती दत्तगिरीजी महाराज यांच्या शुभहस्ते झाला. तसेच जनार्दन स्वामी संस्थानचे रमेशगिरीजी महाराज यांच्या अमृततुल्य प्रवचनाने भाविकांना आध्यात्मिक मार्गदर्शन लाभले. दररोज सायंकाळी हरिपाठात पाऊली खेळताना ग्रामस्थ, महिला, तसेच आबालवृद्ध मोठ्या उत्साहाने सहभागी होत होते. सप्ताहामध्ये ऋषिकेश महाराज कुयटे, भाऊसाहेब महाराज पन्हाळकर, चैतन्य महाराज राऊत, तुकाराम महाराज शास्त्री मुंडे, कृष्णाजी महाराज कमानकर, गोविंद महाराज गोरे आणि तुकाराम महाराज लाड यांच्या जाहीर कीर्तनांनी भाविकांना भक्तिरसाचा आनंद दिला. मृदंगाचार्य सचिन महाराज, गायनाचार्य मच्छिंद्र महाराज, रवी महाराज, तसेच आळंदी येथील वारकरी शिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांनी आपल्या सादरीकरणातून उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

सप्ताहाची सांगता सरला बेटाचे पीठाधीश्वर गुरुवर्य महंत स्वामी श्री रामगिरीजी महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. त्यानंतर काल्याच्या महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. सप्ताहकाळात चणेगावसह पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून भक्तिमय वातावरणाचा अनुभव घेतला. काल्याच्या कीर्तनानिमित्त अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी भाविकांना शुभेच्छा संदेश पाठविला होता. तसेच महाराष्ट्र राज्याचे माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात आणि नाशिक पदवीधर मतदारसंघाचे आमदार सत्यजित तांबे यांनी कार्यक्रमास उपस्थिती लावली. यावेळी काढण्यात आलेल्या भव्य शोभायात्रेतील आकर्षक रथ, संबळ वाद्य, महिला लेझीम पथक, वाजंत्री पथक आणि वारकरी दिंडी हे विशेष आकर्षण ठरले. या भक्तिमय सोहळ्यामुळे भाविक मंत्रमुग्ध झाले होते.

# आर्ट ऑफ लिव्हिंग परिवार आयोजित इंट्युशन कोर्स उत्साहात, ४१ विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग



संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-

प. पू. गुरुदेव श्री श्री रविशंकर यांच्या आशीर्वादाने आर्ट ऑफ लिव्हिंग परिवार, संगमनेर यांच्या वतीने गुंजाळवाडी येथे २३ ते २६ मे दरम्यान ५ ते १८ वर्षे वयोगटातील मुला-मुलींसाठी आयोजित करण्यात आलेला इंट्युशन कोर्स उत्साहात आणि यशस्वीरित्या संपन्न झाला. या कोर्समध्ये तब्बल ४१ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

चार दिवस चाललेल्या या कोर्समध्ये विद्यार्थ्यांना बालसंस्कार, योग, प्राणायाम, जगप्रसिद्ध सुदर्शन क्रिया तसेच इंट्युशन प्रक्रिया शिकविण्यात आली. विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांनी डोळ्यांवर पट्टी बांधून चित्र रंगविणे, रंग ओळखणे, पुस्तक वाचन करणे तसेच रंगीत स्क्यूब सॉल्व्ह करणे यांसारख्या कौशल्यपूर्ण कृती आत्मविश्वासाने आणि अचूकपणे सादर करून उपस्थितांना आश्चर्यचकित केले.


या इंट्युशन कोर्समुळे मुलांची बुद्धिमत्ता, एकाग्रता, स्मरणशक्ती आणि आत्मविश्वास वाढण्यास मदत होते. तसेच मोबाईलचे अति आकर्षण कमी होऊन मुलांचा आहार-विहार सुधारतो व अभ्यासातील ग्रहणक्षमता वाढते, असे अनुभव पालकांनी व्यक्त केले. मुलांमधील सकारात्मक बदल आणि त्यांनी सादर केलेल्या विविध कृती पाहून उपस्थित पालक प्रभावित झाले. आपल्या परिचयातील सर्व मुलांनी हा कोर्स करावा, असे मतही अनेक पालकांनी व्यक्त केले. या कोर्ससाठी तज्ज्ञ प्रशिक्षक म्हणून सचिन शेरकर, प्रतिभा शेरकर आणि सुवर्णा मुळे यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. डी. टी. गुंजाळ, सुभाष पाराशर, म्हस्के सर व खिल्लारी सर यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच स्वयंसेवक म्हणून अलका गुंजाळ, संगीता गुंजाळ, रेश्मा वैभव फापाळे, वंदना गुंजाळ, किरण गुंजाळ, ओंकार थोरात, गणेश वाळुंज, आदर्श गुंजाळ, मंदार जगताप आणि वैभव फापाळे यांनी मोलाचे सहकार्य केले. गुंजाळवाडी गावचे सरपंच, उपसरपंच तसेच ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला. यावेळी आयोजकांनी सर्व सहकाऱ्यांचे व पालकांचे आभार मानले.

# न्यूयॉर्कचे महापौर ममदानी यांचा इराण युद्धाला विरोध

न्युयॉर्क
(वार्ताहर)-

इराणने म्हटले आहे की, तो होर्मुझ सामुद्रधुनीचा वापर आपल्याविरुद्ध लष्करी कारवाईसाठी होऊ देणार नाही. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत इराणचे राजदूत अमीर-सईद इरावानी यांनी सांगितले की, होर्मुझ इराणच्या सुरक्षा आणि राष्ट्रीय हितांशी संबंधित आहे. ते म्हणाले, होर्मुझमधील इराणची कारवाई आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार आहे आणि कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप सहन केला जाणार नाही.



दरम्यान, एपीच्या वृत्तानुसार, अमेरिका-इराण ६० दिवसांच्या युद्धविराम सामंजस्य करारावर (मेमोरँडम ऑफ अंडरस्टँडिंग) सहमत झाले आहेत. मात्र, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची अंतिम मंजुरी अजून बाकी आहे. वृत्तानुसार, या कराराचा उद्देश युद्धविराम वाढवणे आणि इराणच्या अणुकार्यक्रमावर औपचारिक चर्चा सुरू करणे हा आहे. प्रस्तावित करारानुसार, होर्मुझमध्ये जहाजांची वाहतूक कोणत्याही अडथळ्याशिवाय सुरू राहील.

# जनतेत राहून काम करणारे लोकनेतृत्व - शंकरराव गडाख

नेवासा तालुक्याच्या राजकारणात आणि समाजकारणात जनसामान्यांच्या प्रश्नांना केंद्रस्थानी ठेवून काम करणारे नेतृत्व म्हणजे माजी मंत्री शंकरराव गडाख साहेब. सत्ता असो वा नसो, पद असो वा नसो, सर्वसामान्यांच्या सुख-दुःखात सहभागी होत जनसेवेचे व्रत अखंडपणे जपणारे नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे आदराने पाहिले जाते. वयाच्या विशीतच गावागावात फिरत तरुण, शेतकरी, कष्टकरी, माता-भगिनी आणि ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या समजून घेत त्या सोडवण्यासाठी त्यांनी सुरू केलेला प्रवास आजही तितक्याच ताकदीने सुरू आहे. कार्यालयात बसून नव्हे, तर चहाच्या टपरीवर, शेताच्या बांधावर, रस्त्याच्या कडेला किंवा गाडीत बसूनही जनतेची कामे सहजतेने मार्गी लावण्याची त्यांची कार्यशैली सर्वसामान्यांना आपलेपणाची भावना देते. राजकारणात शब्दांचे खेळ करण्यापेक्षा स्पष्ट भूमिका घेणे, खोटी आश्वासने न देता तात्काळ निर्णय घेणे आणि दिलेल्या शब्दाला प्रामाणिक राहणे, हा त्यांचा स्थायीभाव आहे. वेळ आणि वचन पाळणारे नेतृत्व म्हणून त्यांचा लौकिक सर्वदूर आहे.

शेतकरी व कष्टकरी कुटुंबातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी, तसेच शेतकऱ्यांच्या मुलांना उच्च शिक्षणासाठी मदत व्हावी, यासाठी जिल्हा बँकेमार्फत अल्प व्याजदरात कर्ज उपलब्ध करून देण्याचा त्यांनी घेतलेला निर्णय अनेकांसाठी दिलासादायक ठरला. घोडेगाव येथे कांदा मार्केट सुरू करून शेतकरी कुटुंबातील मुलांमध्ये व्यापारी दृष्टिकोन निर्माण केला. यामुळे शेतकऱ्यांना हक्काची बाजारपेठ मिळाली, तर परिसरातील अर्थकारणालाही चालना मिळाली. हॉटेल व्यवसाय, कृषी सेवा केंद्रे, वाहतूक, बारदाना दुकाने अशा विविध क्षेत्रांत रोजगार निर्माण झाले आणि शेकडो तरुण उद्योजक बनले. नेवासा आणि कुकाना येथे बाजार समितीमार्फत उभारण्यात आलेले भव्य व अत्याधुनिक शॉपिंग कॉम्प्लेक्स ग्रामीण भागातील व्यापारी संस्कृतीला नवे बळ देणारे ठरले. अतिक्रमण हटाव मोहिमेमुळे विस्थापित झालेल्या अनेक युवकांना या कॉम्प्लेक्समध्ये गाळे उपलब्ध करून देत त्यांच्या संसाराला नवी दिशा देण्यात आली.

नेवासा बाजार समितीत खुला कांदा लिलाव सुरू करून कांदा उत्पादकांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात त्यांनी पुढाकार घेतला. मुळा सहकारी साखर कारखान्याची क्षमता वाढ, इथेनॉल व वीज प्रकल्प उभारणी अशा निर्णयांतून सभासदांचे हित जपले गेले. शेती, पाटपाणी, आरोग्य, शिक्षण, रस्ते, वीज आणि पाणी यांसारख्या मूलभूत प्रश्नांच्या सोडवणुकीवर त्यांचा कायम भर राहिला आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत सर्व बाजूंनी विरोधकांचा सामना करत त्यांनी अपक्ष म्हणून विक्रमी मतांनी विजय मिळवला आणि राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री म्हणून कार्य करत नेवासा तालुक्याच्या विकासाला मोठी गती दिली. त्यांच्या कार्यकाळात रस्ते, पूल, कालवा दुरुस्ती, लिफ्ट इरिगेशन, बंधारे खोलीकरण, शाळा खोल्या, ग्रामीण रुग्णालये, पशुवैद्यकीय दवाखाने, पाणी योजना, वीज सबस्टेशन आणि प्रशासकीय इमारतींसाठी मोठ्या प्रमाणावर निधी मंजूर करण्यात आला. मुख्यमंत्री जलसंवर्धन योजना सुरू करून राज्यातील जलसाठा वाढविण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. घोगरगाव आणि धनगरवाडी येथील वीज सबस्टेशनच्या कामांमुळे विजेचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागला. विविध पाणी योजनांमुळे गावागावांत शुद्ध पिण्याचे पाणी पोहोचण्याचा मार्ग मोकळा झाला आणि माता-भगिनींच्या डोक्यावरचा हंडा उतरू लागला.



धर्मकारण आणि समाजकारण यांची सांगड घालत तालुक्यातील मठ, मंदिरे, देवस्थाने यांच्या विकासासाठी त्यांनी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला. सभामंडप, सुशोभीकरण, संरक्षक भिंती, मंदिर पुनरुज्जीवन आणि सप्ताहांना मदत अशा कामांतून त्यांनी कोणताही गाजावाजा न करता धर्मकार्य जोपासले. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत व्यक्तिगत टीका आणि विषारी प्रचाराला सामोरे जावे लागले. निसटता पराभव झाला, तरी जनतेशी असलेली बांधिलकी कायम ठेवत आजही ते जनसेवेत सक्रिय आहेत. कार्यतत्परतेची पहाटे चार वाजल्यापासून सुरू होणारा त्यांचा दिनक्रम आणि सकाळी सातपासून जनतेसाठी सुरू होणारी धावपळ ही त्यांच्या कार्याची साक्ष आहे. भेटण्यासाठी आलेला प्रत्येक माणूस समाधानाने घरी जावा, ही त्यांची भावना असते. 'अतिथी देवो भव' या उक्तीप्रमाणे आलेल्या व्यक्तीला चहा-पाणी व अल्पोपहाराशिवाय न पाठवण्याची त्यांची परंपरा आजही कायम आहे.

स्वतःचा वाढदिवस डामडौलात न साजरा करता सामाजिक उपक्रमांतून साजरा करण्यावर त्यांचा भर असतो. म्हणूनच नेवाशाच्या जनतेच्या मनातून एकच भावना उमटते - दूरदृष्टीचे दीप तुम्ही, सेवेचा संकल्प तुम्ही, कर्तृत्वाचा साक्षात धर्म तुम्ही, नेतृत्वाचा तेजोमय वारसा तुम्ही. सर्वसामान्यांच्या जिव्हाळ्याचा आधार तुम्ही. नेवासा तालुक्याच्या सर्वांगीण विकासाचे व्रत हाती घेऊन कार्यरत असलेल्या जनसामान्यांच्या या लोकनेत्याला वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा!

**– राहुल राजळे**
**सोनई**

**मा. आ. शंकररावजी गडाख पाटील ( माजी मंत्री मृद इ जलसंधारण, महाराष्ट्र राज्य ) यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा**

# पाण्यात बुडून एमबीएच्या ३ विद्यार्थ्यांचा मृत्यू



राहाता (युवावार्ता प्रतिनिधी)-

एमबीएच्या ३ विद्यार्थ्यांचा तलावात बुडून मृत्यू झाला. अहिल्यानगर जिल्ह्यातील चंद्रापूर गावात ही घटना घडली. या घटनेमुळे अहिल्यानगरमध्ये एकच खळबळ उडाली आहे. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी गावकऱ्यांनी मोठी गर्दी केली आहे. पोलिसांनीदेखील घटनास्थळी धाव घेतली असून तिघांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, साठवण तलावात बुडून ३ विद्यार्थ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. पोहण्यासाठी गेलेल्या तिघांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. अहिल्यानगर जिल्ह्यातील चंद्रापूर गावात ही घटना घडली. हे तिन्ही तरुण एमबीएचे विद्यार्थी असल्याची माहिती समोर आली आहे. साठवण तलावातील पाण्याचा अंदाज न आल्याने तिघेही पाण्यात बुडाले. स्थानिक त्यांच्या मदतीसाठी धावले, पण त्यांना तिघांना वाचवण्यात अपयश आले.

२४ वर्षीय अभिषेक गंगाधर जाधव, २३ वर्षीय प्रवीण प्रभाकर रसाळ आणि २६ वर्षीय महेश अशोक शिंदे या तीन विद्यार्थ्यांचा दुर्दैवी अंत झाला. या घटनेची माहिती मिळताच लोणी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. तिघांचे मृतदेह ताब्यात घेऊन पोलिसांनी शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवले आहेत. लोणी पोलिसांकडून घटनेचा तपास सुरू आहे.

दरम्यान,इतर घटनेतही पुण्याजवळच्या पानशेत धरणाच्या कालव्यात बुडून एका तरुणाचा मृत्यू झाला. पाण्याचा अंदाज न आल्याने तरुणाचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. तन्मय संदीप शेटे (वय २२ वर्षे) असे या तरुणाचे नाव असून, तो पुण्यातील नऱ्हे येथे राहणारा होता. तन्मय पानशेत धरणाच्या कालव्यात पोहण्यासाठी उतरला असताना अचानक खोल पाण्यात ओढला गेल्याने त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना समजताच वेल्हे पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. त्याचा मृतदेह बाहेर काढून रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे.

ताम्हाणे हॉस्पिटल
पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ ?
आता सुरक्षित आणि सोपे उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
आजच संपर्क करा ! 7219100100

दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!

राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com




भंडारी
"शुभकार्यासाठी शुभवस्त्रखरेदी"
शेरवाणी । कुर्तापायजमा । ब्लेजर । जोधपुरी
पैठणी । घागरा । शालु । कांजीवरम । प्युअरसिल्क । डिजायनर सारीज्
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# डाळींब बागेवर चोरट्यांचा डल्ला

## ९ लाखांचे भगवा डाळींब लंपास

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -संगमनेर तालुक्यातील पठार भागात डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांना हादरवून सोडणारी चोरीची घटना घडली आहे. घारगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील केळेवाडी येथील एका शेतकऱ्याच्या बागेतून तब्बल ९ लाख रुपये किमतीचे भगवा जातीचे डाळिंब अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, केळेवाडी गावच्या शिवारात बबन लक्ष्मण कुऱ्हाडे यांच्या मालकीची डाळिंबाची बाग असून सध्या डाळिंब हंगामाला चांगला बाजारभाव मिळत आहे. याच संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी रात्रीच्या वेळी बागेत प्रवेश करून तयार अवस्थेतील भगवा जातीच्या डाळिंबाच्या सुमारे ३०० कॅरेट फळांवर डल्ला मारला. बाजारमूल्यानुसार या डाळिंबांची किंमत सुमारे ९ लाख रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे.

शेतकरी बबन कुऱ्हाडे यांनी सकाळी बागेची पाहणी केली असता मोठ्या प्रमाणात डाळिंब चोरीस गेल्याचे निदर्शनास आले. या घटनेमुळे त्यांना मोठा आर्थिक फटका बसला असून कष्टाने जोपासलेल्या पिकाची चोरी झाल्याने त्यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

याप्रकरणी बबन लक्ष्मण कुऱ्हाडे (रा. केळेवाडी, बोटा, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर) यांनी घारगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा नोंदवून तपास सुरू केला असून चोरी केलेले डाळिंब वाहून नेण्यासाठी कोणत्या वाहनाचा वापर करण्यात आला, याचाही शोध घेतला जात आहे. दरम्यान, पठार भागात शेतमाल चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# 'काजवा' स्थळी पोलिस पिता-पुत्राकडून वन विभाग कर्मचाऱ्याला मारहाण




युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर- काजवे पाहण्यासाठी अकोले तालुक्यातील भंडारदरा परिसरात पर्यटकांची मोठी गर्दी होत असून वन्यजीव विभागात प्रवेशासाठी पांजरे नाक्यावर शुल्क आकारले जात आहे. या टोल नाक्यावर वाहनांच्या लांब रांगा लागत असल्याने चालक आणि वन कर्मचाऱ्यांमध्ये वादाच्या घटना घडत आहेत. यातच, माझ्या मुलाला का थांबवले म्हणून वनरक्षकाला शिवीगाळ करत कानशिलात व पाठीत मारहाण केल्याची धक्कादायक घटना पांजरे नाक्यावर घडली आहे. याप्रकरणी मुंबई पोलीस दलात कार्यरत असलेले लक्ष्मण बांगर व त्यांचा मुलगा साई बाळू बांगर (दोघे रा. मुरशेत, बांगरवाडी) यांच्या विरोधात सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी राजूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वनरक्षक चंद्रकांत भरत तळपाडे यांनी राजूर पोलिसांत फिर्याद दिली आहे. तळपाडे हे पांजरे नाक्यावर इनचार्ज म्हणून कर्तव्यावर असताना, रात्रीच्या सुमारास नाका मदतनीस परशुराम हरी पदमेरे, नथू गोविंद उघडे,

करण विजय सोनवणे, गणेश धोडू उघडे, अशोक चाहू उघडे, संतोष तुकाराम उघडे, पार्थ गोरख भांगरे यांच्यासह पर्यटकांच्या गाड्यांची तपासणी करून शुल्क आकारत होते. यावेळी एमएच ०५ ईक्यू २६५१ क्रमांकाची पांढऱ्या रंगाची मारुती सुझुकी एक्सएल-६ कार नाक्यावर आली. या कारच्या डॅशबोर्डवर पोलीस नावाची पाटी आणि लाल-निळ्या रंगाचा एलईडी लाईट लावलेला होता.

नाक्यावर वाहनांची रांग असल्याने वनरक्षकांनी चालकाला गाडी रांगेत उभी करण्यास सांगितले. याचा राग आल्याने चालकाने मी स्थानिक मुरशेत गावचा रहिवासी असून रांगेत थांबणार नाही, असे म्हणत शिवीगाळ केली. तसेच माझे वडीलही पोलीस आहेत, तुझ्याकडे पाहतोच, अशी धमकी देऊन वडिलांना फोन लावला. त्यानंतर त्याने गाडी जोरात पुढे नेत नाक्यासमोरील कर्मचाऱ्याच्या अंगावर घालण्याचा प्रयत्न केला आणि रस्त्यात गाडी उभी केली.

काही वेळातच त्याचे वडील त्या ठिकाणी आले. वनरक्षक तळपाडे गणवेशात असतानाही त्यांनी काहीही ऐकून न घेता त्यांच्या गणवेशाची कॉलर धरली आणि तोंडात, डाव्या कानावर व पाठीवर मारहाण केली. 'मी येथील स्थानिक असून माझ्या मुलाला का थांबवले,' असे म्हणत शिवीगाळ केली. तसेच 'पुन्हा आमच्या नादी लागला तर जीवे मारून टाकीन,' अशी धमकी देऊन दोघेही तेथून निघून गेले. या फिर्यादीवरून राजूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर पवार पुढील तपास करीत आहेत.

# साकूर - टेकडवाडीचा पूल बनला धोकादायक



युवावार्ता (प्रतिनिधी)

साकूर - संगमनेर तालुक्यातील साकूर व पारनेर तालुक्यातील टेकडवाडी या दोन गावांना जोडणाऱ्या मुळा नदीवरील कोल्हापूरी बंधाऱ्यावरील पुलाचे संरक्षण कठडे तुटल्याने हा पुल अत्यंत धोकादायक बनला आहे. या पुलाचे लोखंडी संरक्षण कठडे तुटल्यामुळे अपघातांना निमंत्रण मिळत आहे. त्यामुळे पाटबंधारे विभागाने तातडीने येत्या आठ दिवसांत संरक्षण कठडे बसवावे अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक संतोष वाडेकर यांनी दिला आहे.

संगमनेर व पारनेर तालुक्याच्या सीमेवरून मुळा नदी वाहते त्यामुळे साकुरहन पारनेर तालुक्यातील टेकडवाडीकडे येण्या - जाण्यासाठी या नदीवर कोल्हापुरी बंधारा बांधण्यात आला आहे. या बंधाऱ्यावर असणाऱ्या पुलाचे लोखंडी संरक्षक कठडे अनेक दिवसांपासून तुटले आहे. धोकादायक बनलेल्या या पुलावरून अनेक मोटार सायकलस्वार, शाळकरी विद्यार्थी, नागरीक सातत्याने मोठ्या प्रमाणावर ये-जा करत असतात. पुलाचे कठडे तुटल्यामुळे येथे कधीही अपघात होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे संबधीत विभागाने संरक्षणात्मकदृष्ट्या पूर्वकाळजी घेणे गरजेचे आहे.

मात्र अद्यापाहोतो पाटबंधारे विभागाने साधं कुठलही लक्ष न देता पुलाला संरक्षण कठडे बसविले नाही. कठड्याअभावी अपघात होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे संबधीत विभागाने दुर्घटनेची प्रतिक्षा न करता तात्काळ या पुलाच्या संरक्षण कठड्याची तातडीने दुरुस्ती करून नवीन लोखंडी कठडे बसवावेत अशी मागणी भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक संतोष वाडेकर यांनी केली आहे. येत्या ८ दिवसांत पाटबंधारे विभागाने संरक्षण कठडे बसविले नाही तर भूमिपुत्र शेतकरी संघटनेच्यावतीने थेट आंदोलन करण्याचा इशारा संतोष वाडेकर यांनी दिला आहे.

INVOFIX SOLUTION PVT. LTD.
साठी खालील जागा भरणे आहे
JOB VACANCY
मार्केटिंग - १० जागा
टेली कॉलिंग - १० जागा
सेल्स ऑफिसर - ०५ जागा
ड्रायव्हर - ०२ जागा
अनुभवास प्राधान्य आकर्षक पगार दिला जाईल
- पत्ता - श्री स्वामी समर्थ एजन्सी, स्वागत मंगल कार्यालयासमोर अकोले बायपास रोड संगमनेर
- संपर्क - 7030334486, 7030334494



सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का? काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
कर्ज रक्कम वाढ । कर्ज व्याजदर कमी । कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

युवा उद्योग समुहाच्या संचालिका
सौ. प्रियंका सुदीप हासे
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...

- शुभेच्छुक -
युवा उद्योग समूह संगमनेर

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर

डायलिसीस | सुसज्ज ऑपरेशन थिएटर | सीटी स्कॅन
सोनोग्राफी, २डी इको, एक्स रे | अत्याधुनिक लॅब | अत्याधुनिक आयसीयु
०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरुषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणूंची कमी गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य

जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन

डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13




कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25